# माणूस

शनिवार । १६ डिसेंबर १९७८ । ७५ पैसे

## चोची तितका चारा : एक तीव्र प्रतिक्रिया

९ डिसेंबरच्या अंकातला कविता गुपचुप यांचा 'चोची तितका चारा' हा विचार करायला लावणारा लेख वाचला. लेखाचा विषय महत्त्वाचा आहे यात वादच नाही. लेखाच्या अनुषंगाने सुचलेले काही विचार व्यक्त करीत आहे.

लेखाच्या शैलीविषयी काही लिहू इच्छित नाही; पण मूळ मुद्द्याला हात घालायला बराच उशीर लावला आहे आणि शिवाय लेखिका कुटुंब नियोजनाविषयी बोलत आहे की, ( Survival of the fittest ) 'सर्व्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट' या तत्त्वाविषयी बोलत आहे ते कळत नाही, निदान मला तरी ते समजले नाही. ती गोष्ट संपून लेखिकेने माणूस व कावळा या दोघांच्या समाजांची तुलना करावयास सुरवात केल्यानंतर व एकंदरीत सूर लक्षात घेतल्यानंतर लेखिकेला पिल्लाला मारणाऱ्या कावळ्यांचे समर्थन करायचे आहे काय, असा प्रश्न पडतो.

रोगी, दरिद्री, हिडीस, लंगडे, पांगळे, वेडे – (ही सर्व लेखिकेचीच उदाहरणे) 'हे लोक आपल्यासारखीच किंबहुना आपल्याहून वाईट प्रजा निर्माण करून मानवजातीचे नुकसान करतात याची कुणालाच दखल नाहीये' अशी तक्रार लेखिका करते. या ठिकाणी लेखिकेने शास्त्राच्या काही मूळ तत्त्वांना व्यवस्थित फाटा दिला आहे. दारिद्र्य, कुरूपता, पांगळेपणा आणि वेड या गोष्टी अनुवंशिकच असतात, असा लेखिकेचा समज दिसतो; पण खरे पाहिले तर बरेचसे रोग देखील अनुवंशिक नसतात. त्यामुळे लेखिकेने न कळत गृहीत तत्त्व-दोष / Fallacy of assumption केला आहे. तसेच अनुवंशिकता, अपघात, योगायोग आणि दुर्दैव यांची छान गल्लत केली आहे.

'हीच तर आमची माणुसकी! केवळ जन्म देण्यापुरती आठवणारी. जन्म दिला की संपणारी. असली माणुसकी नसलेलीच बरी....असली माणूसरूपी जनावरेच म्हणायची. ...आधीचेच कठीण प्रश्न अशा मुलांच्या जन्मामुळे बिकट होतात.' फक्त ह्याच परिच्छेदात लेखिकेने (त्यांच्या मते) लोकसंख्येच्या वाढीस जबाबदार असलेल्या 'अशा' लोकांखेरीज इतरांकडे लक्ष दिलेले दिसते.

'चोचीसाठी चारा परमेश्वर निर्माण करीत असेलही... ज्यांना चोची नसून तोंडं आहेत त्यांचं काय?...संख्या प्रमाणाबाहेर वाढल्यास प्राणी आत्महत्या करतात. माणसासारखी बुद्धी नसलेल्या पक्षी-प्राण्यांची ही कथा; पण आम्ही माणसं?' असा प्रश्न लेखिका विचारते. म्हणजे माणसांनीही आत्महत्या करावी आणि दुबळ्या मुलांना मारावे असे लेखिकेला सुचवायचे आहे काय? तसे असल्यास ते वाईट आहे.

संपूर्ण लेखात भारतीय समाजाच्या एका विशिष्ट घटकाला लोकसंख्यावाढीसाठी जबाबदार धरून त्यांची फक्त पशु-पक्ष्यांशीच तुलना केली आहे. निसर्गाच्या अधिक जवळ जाण्याचा हा प्रयत्न स्तुत्य आहे; पण हा प्रश्न मानवजातीचा आणि कुटुंब नियोजनाचा असल्याने अमेरिका, इंग्लंड, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया यांपैकी कोणत्याही देशातील समाजाशी तुलना करता आली असती, नव्हे करावयास हवी होती.

वैद्यकीय प्रगतीमुळे मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे, ही गोष्ट फारशी सत्य नाही आणि भारतात मृत्यूचे प्रमाण जाणवण्याइतके कमी झाले असावे असे एकूण सामाजिक परिस्थितीवरून वाटत नाही.

इतर काही मुद्द्यांबरोबरच 'मुलग्याच्या रोगाबद्दल' लेखिकेने व्यक्त केलेली चिंता योग्य आहे. मुलगी आणि मुलगा यांच्यात फारसा फरक मानण्याची आवश्यकता नाही.

भूकंप वगैरे निसर्ग-नियंत्रण हे 'अजब तर्कशास्त्र' नसून माल्थस नावाच्या अर्थशास्त्रज्ञाने दूरदृष्टी ठेवून मांडलेला अर्थशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय सिद्धांत आहे व तो चीनसारख्या देशाच्या बाबतीत खरा ठरल्याचे तज्ज्ञांनी मान्य केले आहे.

वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यावाचून गत्यंतर नाही, या मुद्द्यावर राजनारायण आणि संजय गांधी यांचेही एकमत होईल; पण त्या दोघांचे मार्ग वेगवेगळे होते. संजयचे मार्ग लोकांना न आवडल्याने त्याला कडू फळे चाखावी लागली. असो. हा मुद्दा फक्त उदाहरणापुरताच होता.

आपण आता लेखातील उपायांकडे वळू या.

नं. १ : दोन मुलांनंतर सक्तीचे ऑपरेशन : ठीक आहे.

नं. २ : रोगी, अनुवंशिक रोगी, शारीरिकदृष्टचा व्यंग असलेले, मानसिक तोल सुटलेले यांना मुले असण्याचा 'अधिकार' असू नये. यापैकी अनुवंशिक रोगाचा भाग सोडल्यास इतरांना त्यांच्यासारखीच मुले होतील हा तर्कदोष आहे. हा तर्कदोष लेखाच्या सुरुवातीस येऊन गेला आहे. वेड्यांना शहाणी मुले झाल्याची, पांगळ्या आई-बापांच्या मुलांनी क्रीडा-

पृष्ठ २ वर

# साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे—अंक एकूणतिसावा**

**१६ डिसेंबर १९७८**

**मूल्य ७५ पैसे**



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

▫

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

▫

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

▫

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

▫

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

▫


स्पर्धात नैपुण्यपदके मिळवल्याची उदाहरणे आहेत.

नं. ३ : स्वतःचा संसार चालवण्याचो ऐपत नसलेल्या दरिद्री व भिकारी यांना मुले होऊ नयेत : हा विचार केवळ व्यावहारिक पातळीवरून..योग्य वाटतो; पण हे अशक्य आहे. त्यापेक्षा हे लोक दारिद्र्यातून बाहेर कसे येतील हे पहाणे आवश्यक आहे. मुले न होऊ देण्याने त्यांच्या सामाजिक परिस्थितीत काही बदल होणार आहे काय, असा प्रश्न विचारावासा वाटतो.

नं. ४ : अत्यंत हिडीस असणाऱ्यांना मुले होऊ नयेत. येथेही पुन्हा तर्कदोष आहे. हा मुद्दा पुढे येईलच.

नं. ५ : नोकरी करणाऱ्या बायकांना सक्तीची बिनपगारी रजा ३ ते ४ महिने द्यावी, म्हणजे पुढचे मूल लांबणीवर जाईल. मुळात सुशिक्षित बायकांना एवढे कळतेच त्यामुळे या सूचनेने फारसा फायदा होणार नाही.

नं. ६ : शैक्षणिक पात्रतेच्या सर्टिफिकेटवर कितवा मुलगा—मुलगी याची नोंद असावी. पहिल्या—दुसऱ्या मुला-मुलीला शिक्षणात, नोकरीत अग्रक्रम द्यावा.

ही सूचना नुसती विचित्र ( खरं तर absurd ) नाही तर अमानुष ( inhuman ) आहे. ( स्वतःच्या जन्माला स्वतःच जबाबदार असणारा 'अवतार' एखादाच होतो, तोही हजारो वर्षांतून ! आणि तो जर श्रीकृष्णासारखा आठवा असला तर अखिल मानवजातीचे किती नुकसान होईल ! ) विनोदाचा भाग सोडून देऊ या; पण आपण आपल्या आई-बापाच्या पोटी तिसरे किंवा चौथे म्हणून जन्माला आलो याचे दुःख बाळगत अनेकांना जगावे लागेल. पूर्वी दलितांना आपल्या दलितपणाचे दुःख होते. आता मुलांना आपल्या जन्मक्रमाचे वाटेल.

नं. ७ : लग्न करणाऱ्यांनी ठराविक रक्कम पोस्टात गुंतवावी, तशी सक्ती असावी. ती निवृत्तीनंतर परत मिळावी. ही सूचना चांगली आहे. मात्र नोकरी करणाऱ्यांसाठी भविष्यनिधी असतोच आणि अशी रक्कम गुंतवणाऱ्यांनीच लग्न करावे काय ? निवृत्ती म्हणजे काय ? हे प्रश्न आहेतच.

असो. अगदी शेवटचा मार्ग लेखिकेने सुचवला आहे तो म्हणजे बुद्धिवंत पुरुष व स्त्रिया यांची लग्ने घडवून आणून त्यांना जास्त मुले होण्याची परवानगी ( किंवा व्यवस्था ) हवी. ही कल्पना वेडेपणाची वाटते. सॉक्रेटीस अतिशय कुरूप होता; पण बुद्धिवान होता. लेखिकेने सुचवलेल्या या 'युटोपियन' उपायांमधील नं. ४ प्रमाणे त्याला मुले होऊ नयेत असे आहे. शिवाय अशा कुरूप लोकांशी कोणत्या सुंदर स्त्रिया लग्न करणार ?

असो, लेखिकेने लेखाच्या शेवटी ही मते लोकांना अव्यवहार्य, वेडेपणाची अशी वाटतील असे मान्य केले आहे, व ज्याला ती हवी तशी घेण्याची सूचना केली आहे. असेच होते तर ज्या लोकांना त्यांनी लोकसंख्यावाढीसाठी जबाबदार धरले आहे, त्यांच्यापेक्षा लेखिकेलाच हे जास्त कळत असताना असे उपाय का सुचविले ? लेखिकेचा शेवटचा खुलासा हा फक्त मलमपट्टीसारखा वाटतो. त्यामुळे त्यांच्या आधीच्या लिखाणाची धार बोथट झाली असली तरी पूर्वी ती तेज असताना झालेल्या मानसिक जखमांवर त्यामुळे इलाज होणार नाही एखादी गोष्ट दुसऱ्यांना देत असताना ती चांगलीच द्यावी असे आपले पूर्वज म्हणत, मग ते अन्न असो की उपदेश !

९ डिसेंबर — सोमनाथ पाटील, पुणे

# हक्कभंग प्रकरण : शिक्षा सौम्य असावी

श्री. ग. मा.

" श्रीमती गांधींविषयी 'विसरा आणि क्षमा करा' अशा स्वरूपाची भूमिका घेण्याबाबत सरसंघचालक बाळासाहेब देवरस मार्च ७७ मधल्या जनता पक्षाच्या यशापासूनच सांगत आले, ते काही ते श्रीमती गांधींचे चाहते आहेत म्हणून नव्हे, त्यांना राजकारणातला व्यवहार उमगला आहे, हे त्याचे खरे कारण आहे. श्रीमती गांधींना मानणारा एक मोठा वर्ग या देशात आहे, हे खासदार मधू लिमयांना काल-परवा उमगले, तसे देवरसांचे झालेले नाही. या वर्गाला श्रीमती गांधींपासून अलग कसे पाडता येईल, याचा विचार जनता पक्षाचे नेतृत्व करील, तर ते हवे आहे; पण आडदांडपणा आणि धैर्य यांची गल्लत करणारे श्रीमती गांधींना हुतात्मा बनवायला अधीर झाले आहेत..."

कुणाला वाटेल ही वाक्ये एखाद्या संघप्रेमी जनाने लिहिली वा उच्चारलेली असतील. तसे नाही. संघाविरोधाची परंपरा असलेल्या पुण्याच्या केसरीने हे लिहिलेले आहे. पहा : 'इंदिरा गांधींना हेच हवे!' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेला ४ डिसेंबरचा अग्रलेख. जसे दादा मंत्रिमंडळ पाडून पवार मंत्रिमंडळ आल्यावर मुंबईच्या म. टाइम्सने प्रचंड आकाराचा मथळा पहिल्या पानावर झळकवून आपला गगनातही न मावू शकणारा आनंद प्रकट केला होता, तसाच चिकमगळूरच्या इंदिरा-विजयानंतर केसरीला झालेला आनंद पहिल्या पानावरून दुथडी भरभरून वाहात होता. त्यामुळे इंदिरा गांधींना नेमके काय हवे आहे, हे सांगण्याचा वा कळण्याचा अधिकार केसरीला आपोआपच प्राप्त होतो, हे उघड आहे; पण देवरसांच्या काठीने मधू लिमयांना ठोकून केसरीकारांना नेमके काय साधायचे आहे, त्यांना काय हवे आहे त्याचा अग्रलेखात तरी स्पष्ट उल्लेख नाही. इंदिरा गांधींच्या अपराधाबाबत जनता शासनाने 'विसरा आणि क्षमा करा' ही भूमिका घ्यावी असे स्पष्ट मत अग्रलेखात तरी मांडलेले नाही. आडवळणाने तसे सूचित करण्याचा प्रयत्न दिसतो व त्यासाठी देवरसांचा आधार केसरीकारांना घ्यावासा वाटलेला असावा. देवरसांना ७७ च्या निवडणुका झाल्यावर लगेचच जी भूमिका घेण्याचे धाडस दाखवता आले ते केसरीकारांना ७८ संपत आला तरीही का दाखवता येऊ नये हे एक कोडेच आहे. का बुरख्यांची सवय जात नाही असे समजायचे ?

'टाइम्स'च्या गिरिलाल जैन यांनी मात्र बुरखा वगैरे न घेता या विस्तवाशी न खेळण्याचा सल्ला जनतानेत्यांना उघडपणे दिलेला आहे. ते लिहितात–

It is not my case that a decision to leave her in peace can solve the fundamental problem we face. The country has entered the era of mass politics, with all that implies by way of threat to standards and liberties. But to persecute her can only complicate the problem. One does not need to be a supporter or admirer of her to recognize this reality". ( टाइम्स ऑफ इंडिया, दि. ५ डिसेंबर)

जैन यांच्या लेखाचे उपशीर्षक आहे 'Divorce between legality and political process.' मतितार्थ असा की, इंदिरा गांधींवर खटले भरणे, त्यांना दोषी ठरवणे वगैरे कितीही कायदेशीरपणाचे असले तरी राजकीय वस्तुस्थितीही त्यांच्या बाबतीत ध्यानात घेतली जायला हवी. आपण जमावशाही युगात प्रवेश केलेला आहे. लोकशाहीचे आदर्श आणि प्रथा यांना या युगात धक्के पोचत राहतील हे आपण गृहीत धरायला हवे. असे धक्के दिल्याबद्दल इंदिरा गांधींना फार कठोर शिक्षा फर्माविण्यात आली, सूडभावनेने त्यांचा छळवाद करण्यात आला तर परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची बनेल. जैन लिहितात–' If the system rejects her–that is what her expulsion from parliament will amount to–and nullifies the electoral verdict in her favour, she will seek power outside the system.' म्हणजे कायद्यावर बोट ठेवून इंदिरा गांधींची लोकसभेतून पूर्णवेळ हकालपट्टी करण्यात आली तर चिकमगळूरचा लोकनिर्णय अव्हेरला गेला असा अर्थ होईल व मग त्या कायद्याला–लोकशाही पद्धतीलाच आव्हान देऊन सत्ता काबीज करायला मोकळ्या होतील. याचा अर्थ इंदिरा गांधींनी भविष्यात लोकशाही यंत्रणा मोडली–फोडली तरी त्याचे खापर मात्र जनता नेत्यांवर टाकून जैनसाहेब आजच मोकळे होत आहेत व हे टाळायचे असेल तर कायदा त्यांच्या बाबतीत तुटेपर्यंत ताणू नका असा सूज्ञ सल्लाही देत आहेत.

महाराष्ट्रातले काही निवडक यशवंतनिष्ठ आणि द्वेषभावनेने पछाडलेले देशातील मूठभर राजकीय नेते सोडले तर समाजातल्या बहुतेक थरातून असाच सल्ला जनता-नेत्यांना दिला जातो आहे, असे कानोसा घेतल्यास कुणाच्याही ध्यानात येईल. याचे अगदी मूळ कारण आपली प्रकृती हे आहे. महाभारत हा एक सूडाचा प्रवास असो नसो; पण सूडाचे तत्त्वज्ञान, सूड घेण्याची वृत्ती येथील जनतेच्या रक्तातच कमी आहे. कातडीचा रंग जसा बदलता येत नाही तसे हजारो वर्षांच्या बऱ्यावाईट संस्कारांतून निर्माण झालेली ही वृत्तीही एकाएकी बदलत नाही. ही वृत्ती, हा स्वभाव सर्वसाधारणपणे क्षमाशीलतेचा आहे. त्यातून इंदिरा गांधी या एक स्त्री आहेत. त्यामुळे क्षमेचा, सहानु-

भूतीचा लाभ त्यांना अधिकच व्हावा हेही स्वाभाविक आहे. ज्या क्षणी रायबरेलीत इंदिरा गांधी पराभूत झाल्या त्याच क्षणी सर्वसामान्य भारतीय जनतेने त्यांना मनोमन क्षमा करूनच टाकलेली आहे, हे, त्यांना कठोर शासन झाले पाहिजे, असे म्हणणाऱ्या जहालवाद्यांनी लक्षात ठेवायला हवे. इंदिरा गांधींनी हक्कभंगप्रकरणी लोकसभेची बिनशर्त माफी मागितली तर त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई होऊ नये, असे मधू लिमये–राजनारायण यांच्यासारखे त्यांचे कट्टर विरोधकही म्हणत आहेत, ही व्यापक जनभावनेची त्यांनी नोंद घेतली आहे याचेच एक लक्षण आहे. प्रश्न आहे त्यांनी बिनशर्त माफी मागितली नाही तर काय करायचे, ह्या. तीच शक्यता अधिक दिसते.

एकतर्फी सौम्य शिक्षा देऊन त्यांना मोकळे ठेवणे, राजकीय पातळीवर त्यांच्याशी मुकाबला करणे हा कमी त्रासाचा मार्ग आहे. त्यांना आव्हानात्मक पवित्र्यात ढकलणे फायदेशीर नाही; कारण त्यामुळे त्यांची मुळातच लढाऊ असलेली प्रतिमा अधिक प्रखर व बळकट होईल व जनता-नेत्यांचा शामळूपणा पुन:पुन्हा जनमानसावर ठसत राहील. लढाऊ प्रतिमा, आक्रमक राजकारण, गतिमान हालचाली, उठावदार धोरणे हे इंदिरा गांधींचे बळ आहे आणि जनता-नेत्यांजवळ तर या बळाचा पूर्ण अभाव आहे. या बळाचे जनसामान्यांना फार आकर्षण असते, जमावाची ताकद या बळावर उभी करता येते. समस्तीपूर–फत्तेपूर येथील निवडणुकांची आकडेवारी काहीही सांगो, आपण भारतीय क्षमाशील आहोत तसेच भावनाप्रधानही आहोत. निवडणुका हवेवर होतात, लाटा अचानक उसळतात आणि वितळतात. शिवाय इंदिरा गांधींना फक्त मागासलेले वर्ग, अल्पसंख्य यांचाच पाठिंबा आहे, या भ्रमात न राहिलेले बरे. गाड्या वेळेवर सुटणे, शाळा–कॉलेजे नीट चालणे, कारखान्यांतून संप न होणे, आंतरराष्ट्रीय दडपणांना झुगारून देण्याची तयारी असणे, गुन्हेगारी व दंगली यांना आळा बसणे यावर इंदिरा गांधी किंवा तत्सम शक्ती हा एक अक्सिर इलाज आहे, असे मानणारा फार मोठा वर्ग देशात आजही अस्तित्वात आहे. यात थोर-थोर पत्रकार, विद्‌वान व साधारणपणे ज्यांना बुद्धिमंतांचा वर्ग असे म्हटले जाते त्यांच्यातीलही काहींचा समावेश आहे. लोकशाही म्हणजे मंदगती गोलंदाजी, कंटाळवाणा खेळ. काही वेळा अशा येतात की, समाज द्रुतगती गोलंदाजीची मागणी करतो, कंटाळवाणा खेळ पाहत राहण्याचे नाकारतो. हे मागासलेल्या गरीब देशातच घडते असे नाही. डी गॉलला फ्रान्सच्या जनतेने पुन्हा का बोलवावे ? आपल्याकडेही एक डी गॉल आहे हे विसरले जाऊ नये. त्याला डिवचून अंगावर घेण्याची ताकद आज एकाही जनता-नेत्याजवळ नाही ही वस्तुस्थिती आहे. ही ताकद कशी वाढेल याचा विचार जनता-नेत्यांनी प्रथम करावा. डिवचण्याचा खेळ सध्यातरी महागात पडण्याचीच शक्यता अधिक आहे. ☐

# आढावा । चिकमगळूरनंतरचा

वा. दा. रानडे

या वर्षाचे शेवटचे दोन महिने राजकीय घटनांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार असे दिसते. चिकमगळूर, समस्तीपूर व फत्तेपूर या लोकसभेच्या तीन गाजलेल्या पोटनिवडणुका, इंदिरा गांधींचे कॉंग्रेस-ऐक्याचे आवाहन व त्याच्या प्रतिक्रिया, इंदिरा गांधींचे लोकसभा-हक्कभंग-प्रकरण, चरणसिंग यांनी मंत्रिमंडळात न जाण्याचा घेतलेला अखेरचा निर्णय, मोरारजीभाई देसाईंच्या खुनाच्या कटाच्या बातमीने उठलेले वादळ या महत्त्वाच्या घटनांनी मरगळलेल्या राजकारणात रंग आला आहे. वृत्तपत्रांत या घटनांसंबंधी सविस्तर बातम्या येऊन गेलेल्याच आहेत. त्यांची पुनरुक्ती न करता जे मुद्दे दुर्लक्षित झाले, बदलत्या राजकीय प्रवाहांच्या दृष्टीने या घटनांमध्ये जे विशेष जाणवले त्याकडेच मुख्यत: येथे लक्ष वेधीत आहे.

प्रथम विचार तीन पोटनिवडणुकांचा.


चिकमगळूर निवडणुकीत इंदिरा गांधींना विजय मिळविणे सोपे जाणार नाही, असे अंदाज मतदानाच्या आदल्या दिवसापर्यंत साऱ्याच वार्ताहरांनी केले होते; पण प्रत्यक्षात इंदिरा गांधी ७७ हजार मतांच्या आघाडीने निवडून आल्या. परिस्थिती जवळून पाहून आलेल्या वार्ताहरांनाही वस्तुनिष्ठ अंदाज का करता आले नाहीत ? प्रचार-मोहिमेने तेही भारावून गेले असे दिसते. पूर्वी मुंबईतील आचार्य कृपलानी–कृष्णमेनन निवडणुकीच्या वेळी असेच घडले होते. मतांच्या प्रमाणावरून निवडणूक-निकालाची अधिक यथार्थ कल्पना येते. चिकमगळूर लोकसभा मतदारसंघाच्या कक्षेत येणाऱ्या आठ विधानसभा मतदारसंघांपैकी तीन मतदारसंघांत इंदिरा गांधींना ५० टक्क्यांपेक्षा कमी मते मिळाली आहेत, हे पुढील आकड्यांवरून दिसून येते.

| मतदारसंघ | मतदान | इंदिरा गांधी |
| --- | --- | --- |
| तारीकेरी | ६४७०६ | ३२१३४ |
| कडूर | ५६६९७ | २७३४० |
| बिरूर | ५५०२४ | २६६९८ |

इंदिरा गांधींना १९७७ मधील कॉंग्रेस-उमेदवाराच्या मतांपेक्षा दोन टक्के मते कमी मिळाली. विधानसभा मतदारसंघवार आकडे पाहिले तर असे दिसते की, फक्त मुडिगेरी मतदारसंघात त्यांना फेब्रुवारी १९७८ मधील कॉंग्रेस-मतांपेक्षा थोडी म्हणजे ८२१ कमी मते मिळाली आहेत. इंदिरा-कॉंग्रेसच्या मतांच्या प्रमाणातही तीन टक्के घट झाली; तशी जनता पक्षाच्या मतांचे प्रमाणातही तीन टक्के घट झाली. पण कारकळ मतदारसंघ वगळता बाकी सातही मतदारसंघांत जनता-उमेदवाराला फेब्रुवारी १९७८ पेक्षा अधिक मते मिळाली आहेत. कारकळमध्ये मात्र ३५४५मते या वेळी कमी मिळाली. फेब्रुवारी १९७८ च्या विधानसभा-निवडणुकांत बिरूरची जागा

पृष्ठ २२ वर

**एक वर्षानंतरही ज्यातील ताजेपण कमी झालेले नाही . . . . . .**



# आन्ध्रानुभव

## १ डिसेंबर ते १७ डिसेंबर १९७७

**अविनाश धर्माधिकारी**

१९ जुलैला प्रबोधिनीत एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. हिंदुस्थानच्या चित्रमूर्तीच्या प्रतिष्ठापनेचा. आम्ही ज्या ईश्वरी शक्तीचे अंश आहोत, जिची आम्ही उपासना करतो तिचेच एक मूर्तरूप म्हणजे आमचे राष्ट्र : शिवाय त्या दिवशी गुरुपौर्णिमा होती. तर, राष्ट्र हेच आमचे गुरुदेव अशी उदात्त संकल्पना त्यामागे होती.

रात्री ९ वा. उपासना मंदिरात समोरच्या भितीवर ओंकाराच्या मागे हिंदुस्थानची चित्रमूर्ती आहे. पठारे, डोंगर, नद्या, सपाटी समुद्र असे भौगोलिक भाग विविध रंगांत जिवंत साकार केलेत. त्यावर प्रकाशझोत व्यासपीठावर अध्वर्यू पुरुष सूक्त सांगत आहेत. सहस्रशीर्षा पुरुषा... माझी नजर त्या चित्रमूर्तीवर. कॅमेऱ्याने एखादे सुंदर दृश्य वेगवेगळ्या कोनांमधून दाखवत कुठे तरी खिळवून टाकावं तशी माझी नजर चित्रमूर्तीवरून फिरत फिरत महाराष्ट्रावर स्थिरावली... महत्त्वाच्या नद्यांच्या ठळक रेषा उमटलेल्या होत्या. त्यातलीच एक रेष किंचित् आग्नेयेकडे उतरत जाऊन पूर्वसमुद्रात घुसलेली. माझ्या समोरचे चित्र धूसर व्हायला लागलं. वेगाने प्रवास करताना भराभरा झाडे मागे पळावीत तशा आजूबाजूच्या अस्तित्वांच्या संवेदना मागे पळत गेल्या ... विस्मृतीच्या कप्प्यात जाऊ पहाणारा तो अनुभव कृष्णा नदीच्या आठवणींनी जागा झाला. ही कृष्णा महाबळेश्वरावरनं उड्या घेत नवथर तरुणीसारखी गात – नाचत, आणखी सख्यासाजणीना बरोबर घेऊन सूर्याच्या दिशेने वाहत सुटते. मग संथ होते, विशाल होते. आन्ध्रमधून पूर्वसमुद्राला गवसणी घालते. बस्स तेच ठिकाण...जिथे सागराला कृष्णा मिळते...

¤

आन्ध्र... एक एक चित्र आता स्पष्ट होतंय... आज बरोबर आठ महिने झाले. एकोणीसशे सत्त्याहत्तरच्या नोव्हेंबरातला एकोणिसावा दिवस. आम्ही प्रबोधिनीचे कार्यकर्ते विस्तार शिबिरांसाठी गावांना गेलो होतो. मी रत्नागिरीला... १९, २०, २१ नोव्हें. ला. तिथलेही वातावरण वादळीच होते.

तशात उगीचच आपले धाडस म्हणून मालवणला जाऊन आम्ही सिंधुदुर्ग पाहून परतलो. आनंदात. तोवर काय उत्पात झालेला आहे याची कल्पनाच नव्हती. ' रत्नभूमी ' मध्ये पुसट काही तरी वाचले

होते... आन्ध्रमध्ये वादळ... पुण्याला आलो तेव्हा बातम्या अशा अंगावर चालून यायला लागल्या.

पहिले दोन दिवस काही सुधरतच नव्हते. जोरात थप्पड बसल्यावर काजवे चमकावेत तसेच झाले असणार. मग वर्तमानपत्रे भरायला सुरुवात झाली... फोटो... बातम्या. 'सकाळ 'चे एम्. के. कुलकर्णी तिकडे गेले. त्यांच्या बातम्यांना सकाळ पुरेना तेव्हा जाणवले की हे आपल्याला बोलवणे आहे. जायाला हवे– मग बी. कॉम. चे शेवटचे वर्ष का असेना. इथे थांबून आता थोडाच अभ्यास करणार आणि माझेच काय सांगू, दहावीची मुलेही एका पायावर तयार झाली !

आन्ध्र अन् महाराष्ट्र शेजारी भाऊच की, महाराष्ट्रातल्या एका मावळाचे नाव आन्ध्र मावळ असे आहे. महाराष्ट्रातल्या कर्तृत्वशाली गौतमीपुत्र सातकर्णीचे घराणे 'आन्ध्रभृत्य' हे ऐतिहासिक; पण या तऱ्हेने महाराष्ट्रातल्या 'कृष्णेच्या पाण्यातूनी अजुनी वाहणारा सगळा लाव्हा' आन्ध्रचीच भूमी भिजवतो की ! काळीशार सुपीक करतो.

बापट गिरीश मा. आप्पांना भेटला. 'आपण काय करूयात ? मी जाऊ का प्रत्यक्ष.' गिरीश 'तुम्ही काय करणार आहात ?' असा प्रश्न विचारण्याएवढी 'हक्कांची जाणीव' अजून त्याला आलेली नाही. आप्पांनी सांगितले 'तुम्हीच ठरवा. योजना करा' याचा अर्थ जा.

गिरीश निघाला. बावीस वर्षांचा M. E. S. मध्ये M. S. C. करतोय. आम्ही त्याला कामाचा पहाड म्हणतो, भोसरीला कारखाना चालविणाऱ्या श्रीकांत भाटेंना हाक दिली. दोघेही वळकटी बांधून सुटले. कुठे गेले, कसे गेले तेच जाणे ! दोन दिवसांनी तार आली. 'Money, Materid Men required as much as possible Immediately.'

झाले, आठवलेसरांनी पुण्यातले मदतकार्य उभे केले. कपडे, पैसा धडाधडा ढीग वाढायला लागला. 'आम्हाला आन्ध्रला जायाचेय' म्हणणारे तरुण येऊन भेटायला लागले.

आप्पांनी मोहनला बोलवून घेतले. मोहन गुजराथी. 'आन्ध्रला लवकरात लवकर निघा ! त्या तुकडीचे तुम्ही प्रमुख' बस्स, दोन वाक्य. हाही गिरीशएवढाच. पुण्यात एक वर्ष जास्ती पाणी आले होते तेव्हाचा थोडा मदतकार्याचा अनुभव आणि म्हणे 'उठा. जा तिकडे' काय गंमत आहे का काय ? पण नाही, जायचेच. मोहनचे काम म्हणजे योजनाबद्ध आखीव काम. दुपारी ११, १२ ला हे बोलणे झाले. संध्याकाळी चारला सहज म्हणून चक्कर टाकायला गेलो तर मोहन टेबलावर 'पेपरवर्क' करत होता. त्याने विचारले 'आब्या निघतोस का?' संकेत ठरलेले आहेत. मी म्हटले 'हो कधी?' 'आता सिकदराबाद एक्स्प्रेसने.'

हादरलोच. चार वाजलेत. अन् पावणेपाचच्या गाडीने जा म्हणून हा गृहस्थ सांगतोय, 'जा ! सिकंदराबादला. तिथून कृष्णा एक्स्प्रेसने विजयवाड्याला. तिथून S. T. ची चौकशी करून अवनीगड्डाला आणि तिथे कुठे तरी चौकशी कर गिरीश बापट कुठे आहे म्हणून.'

मी शांतपणे मान डोलावली, 'बरे पुढे ?'

'त्याच्याकडून सगळी माहिती गोळा करून ठेव. बघ डोके चालव, आम्ही गट जमवून उद्या येतो. आल्या आल्या कामाला सुरुवात करता येईल अशी आखणी कर.'

¤

निघालो, मी आणि प्रमोद. स्टेशनवर जाता जाता दोन मिनिटं वडलांना भेटलो. भडकतील असे वाटले, 'काय हे तुझे नेहमीचेच. खिडीत गाठतोस वगैरे'; पण नाही, खुशच झाले. हातावर दहा रु. ठेवले. 'ठेव जवळ' अस्मादिक खुष.

हे सगळे झाले तेव्हा एक डिसेंबर मावळत होता. दोनला संध्याकाळी अवमीगड्डाला पोहोचलो. खोल खोल पाण्यात असताना डोक्यावर पाण्याचा दाब वाढत जावा तसा वादळाच्या खुणा वाढत गेल्या. आधी–चार दोन पडलेली झाडे...मग वाकलेले खांब... तुटक्या तारा...उलटून पडलेली मालगाडी ..रस्ते उखडलेले. कृष्णा एक्प्रेस धावत विजयवाड्याला टेकली. ती जाते खरी गुंतूरपर्यंत; पण त्या वेळेला विजयवाड्यापर्यंतच जायची. मग तर शहारे येण्याइतका विध्वंस.

आपल्यासमोर काय वाढून ठेवलेले असणार याची कल्पना होती. तरीही जरा जडच गेले. कृष्णा नदीचा त्रिभुज प्रदेश हा दिवी तालु–काअवनीगड्डा हे तालुक्याचे ठिकाण, नाल्यामध्ये झाडे कोसाळून पडलेली. त्यातच जनावरांची प्रेते अडकून फुगलेले काचेच्या गोट्यांसारखे डोळे ! बाप रे अवनीगड्डा तर निर्वासितांचा तळ होऊन राहिला होता. सगळीकडे चिकाचिकाट गर्दी आणि झपाटून टाकणारा सुन्नपणा. चारदोन शिल्लक राहिलेली धडकी ! धडकी चिटोरी बांधून मातसे धुगवत होती स्वतःला

'काय अपराध होता. आमचा म्हणून आम्हाला ही शिक्षा दिलीस देवा !' असेच एकूण ? पण देव कुठला अन् अपराध कशाचा १७ नोव्हेंबरच्या सुमारास अंदमानच्या भागत कुठे तरी कमी दाबाचा वट्टा निर्माण झाला. वादळाने भराभरा देह फुगवला. तिथून हैवानासारखे धावत सुटले. तामिळनाडूत थोडा तणाव माजवून हीव भरल्यागत ताशी १४० मैल वेगाने रोरावत दिवी तालुक्यात शिरले. शिरताना बरोबर समुद्राची, हीऽऽ, पन्नास मैल लांब, १८ फूट उंच लाट घेऊन घुसले !

१९ नोव्हेंबरला संध्याकाळी ४॥ च्या सुमाराला रेडियोवर सांगत होते की, 'वादळ निर्माण झालेले असून दिवी, बापटाला तालुक्यांना धोका आहे. नागरिकांनी सावध रहावे !' बातमी पूर्ण होतीय तोवर लाट घुसलीच ! सपाट्यात येईल. ते गिळाकृत करून समुद्रापासून दहा मैल आतपर्यंतचा भाग पादाक्रांत केल्यावर कोटुरूपाशी येऊन शांतावली. बाकीच्या ठिकाणीही चक्रीवादळ झाले. त्याने वित्तहानी प्रचंड झाली; पण प्राणहानी कमी. इथे म्हणजे लाटच आली.

अन् हा सगळा प्रदेश सपाट. किती लांबपर्यंत क्षितिज दिसते. लाटेला कुठे अडथळाच नाही. जीव घेत सरळ दहा मैल आत घुसली. शेतातल्या रोपांनी माना टाकलेल्या. मग रात्रभरमुसळ धार पाऊस. घोघावते वारे. कोणाचा कोणाला पत्ता नाही. काहीजण चर्चमध्ये, मंदिरात, एखाद्या घराच्या गच्चीवर; पण आसपास सगळी खेडी. तिथे सिमेंटची घरे कुठून येणार ? सगळी खेडी होत्याची नव्हती झाली ! शेतात खारं पाणी घुसून राहिले.

रात्रीच्या सुमाराला याहून मोठी लाट आली. पण नशीब म्हणजे आधीच्या लाटेचे पाणी याच वेळेला परतत होते. त्यामळे ती लाट

फुटली. मग जगले–वाचले ते अवनीगड्डा, मछलीपट्टणम इथे गेले.

मग ते सगळे निस्तरणे आले. अवनीगड्डयात कळले की गिरीश बापट नावाचा कोणी महाराष्ट्रीय मुलगा कोडुरूला जाऊन ठिय्या देऊन बसला आहे. गिरीशचे काम हा तिथल्यांच्या चर्चेच्या, कौतुकाचा, आश्चर्याचा विषय होऊन राहिला होता. मनात म्हटले, 'भले बहाद्दर हा प्रत्यक्ष गुहेतच गेला की !'

रात्रीच्या एका गाडीने कोडुरूला गेलो. अवनीगड्डा–कोडुरु हा दहा मैलांचा रस्ता कसा झाला होता ? गाडीच्या दिव्यांच्या झोतात तो जखमी वीरासारखा शत–शत ठिकाणी उखडला गेला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी नाले आहेत, त्यात झाडे कोलमडून पडलेली. गाडी उडत–खडखडत खड्डे पार करत होती. आपला नसरापूर–वेल्हे हा रस्ता थोडाफार त्याचे छोटे स्वरूप.

मग कोडुरूचं दर्शन. दगडी रस्ते–एका पुलाशेजारने बस डाव्या हाताला वळली की कोडुरू चित्रासारखे समोर येत. अंधार पडलेला. दिवे गेलेले. दणढणत्या किंवा टिमटिमत्या बत्त्यांच्या प्रकाशात दबकत दबकत व्यवहार चाललेले. पुन्हा लाट येते की काय ही भीती ! पुण्यात एक दिवस दंगल झाली तर दुसऱ्या दिवशी, मोर्चा येतोय अशी अफवा पसरल्याबरोबर लक्ष्मीरोड ओस पडला होता की !

गिरीश Rss च्या कँपमध्ये रहात होता. श्रीकांत भाटे काम होते म्हणून परतले होते. हा एकटाच. पोहचलो तेव्हा झोपलेला होता. आम्ही उठवले. दोन मिनिटे त्याने ओळखलंच नाही. मग एकदम आनंदित झाला. मग गप्पा–चर्चा–कसे काम करू यात !

गिरीश, श्रीकांत हीच दोघे इथे पोहचलेली पहिली जिवंत माणसे! त्यांनी गावे पाहिली. हे कोडुरु, दिंटि मेरेका माणसांची प्रेते अशी पावलापावलाला पडलेली. सगळा विध्वंस ! आपल्या हातून चुकुन एखाद्याला थप्पड बसली तरी आपण अस्वस्थ होतो. इथे माणसांची प्रेते कसल्याही अवस्थेत ! पुरुष, स्त्री मुलगा, वृद्ध, तरुण. निसर्गाने कसला कसला म्हणून भेद ठेवला नव्हता...

पहिले काम प्रेतांची विल्हेवाट लावण्याचे, आता दहा-बारा दिवस होऊन गेले होते. खाऱ्या पाण्यात प्रेते होती म्हणून कुजली नव्हती किंवा गिधाडेही आली नव्हती. हे नव्हती. Rss नेही मदत कार्य सुरू केले होते. गिरीश त्यांच्यातच राहिला. त्याची 'शव–सेना' तयार झाली.

सकाळी उठायचे–फावडी, टोपल्या, फिनेल, कापड घेऊन कामाला भराभरा खड्डे खणायचे, प्रेत धरून ओढत आणायचे, पुरायचे, माती पसरायची, पुढे दिवसाच्या शेवटी एका रांगेत सगळ्यांनी म्हणायचं...

वासांसि जीर्णानि यथा विजय ..

तेवढाच आपला एक दिलासा.

गिरीशचा चेहरा सांगताना असा फुलून आला होता. मेणबत्तीच्या प्रकाशात तो अस्वस्थ झालेला जाणवत होता.

□

दुसऱ्या दिवशी पुण्याहून तुकडी आली पस्तीस जणांची. त्यात नंदू घाटेंच्या बरोबर सात शिवसैनिकही होते. सगळेच मोहिमेवर निघालेल्या जवानांसारखे दिसत होते. चुस्त, तयार. पाठीवर रॅकसॅकस टाकून कुठल्याही तयारीने आलेले. कुठे रहायचे ? माहीत नाही. किती दिवस रहायचे ? ठाऊक नाही. जेवणाचे काय ? मिळेल कुठे तरी. अगदी दहावीची छोटी पोरेसुद्धा क्लासेस्, प्रॅक्टिकल्स् सगळे बाजूला ठेवून हे प्रॅक्टिकल करायला आली होती. शिवाय महाविद्यालयीन प्रबोधिनीचे कार्यकर्ते कामाचे संकेत, पद्धती परिचित.

कोडुरूला सगळे आले. आता हाच तळ. इथून उलटा हल्ला चढवायचा समुद्राकडे. रचनात्मक घडणीचा. हेही एक आंदोलनच. एका जमीनदाराने त्याच्या घरातल्या दोन खोल्या आणि एक कोठीची खोली रहायला दिली. लगेच तिथे कार्यालय थाटले. ३५ जणांचे पाच गट केले. तीन एका खोलीत. दोन एका खोलीत. झोपायची व्यवस्था. कपाटात शिस्तीत सामान ठेवायचे. तिथल्या पाणी, खोल्यांची व्यवस्था, कार्यालय या जबाबदाऱ्या गटांकडे वाटून दिल्या.

संध्याकाळी जेवण झाले. जेवण म्हणजे पत्रावळभर भात. इकडे भात, तिकडे भात, पहिला भात, शेवटचा भात; पण कोणाची तक्रार नाही की तोंड वाकडे नाही. कारण याही जेवणाची अपेक्षा नव्हती. जेवणाचे हाल होतील असे वाटले होते. इथे निदान जेवण तरी मिळतेय. पुण्यात खाण्याच्या बाबतीत अत्यंत 'अभिरुचिसंपन्न' असणारांनी तिथे समोर येईल ते मिटक्या मारत खाल्ले. झालेला विध्वंस पाहून पोटही अवाक् होऊन गप्प बसले असावे. जेवण RSS कँपवर.

इथे RSS चे काम प्रथम सुरू झाले. व्यंकटेश्वरलु हे एक प्राथमिक शिक्षक. अवनीगड्डयात त्यांचे घर. दिवी तालुका संघचालक. वादळाच्या दुसऱ्या दिवशी हे धडपडत कोडुरूत गेले. तिथे आपल्या घरचे सगळे धान्य वाटून टाकले. पैसे सगळे वाटून टाकले. 'आदेशाची' वाट न पहाता कामाला सुरुवात केली. मग चक्रे फिरली. हा प्राथमिक शिक्षक आपल्या घरी महिनाभर किमान पन्नास स्वयंसेवकांना विनातक्रार पोसत होता. त्याच वेळेला महाराष्ट्रात शिक्षकांचा 'Scale'साठी संप चालू होता.

त्यानंतर सगळे आले. तरुण आले. प्रौढ आले. स्काउटस् आले. NSS ची पोरे आली. कम्युनिस्ट, नक्षलवादी, रामकृष्ण मिशन, आनंदमार्गी अशा अख्ख्या भारतातून लोकांचा आणि मदतीचा प्रचंड ओघ आन्ध्रकडे लागला. सगळे भेद बाजूला सारून, हातात हात घालून काम करत होते. तिथे संघाचे 'नमस्ते सदा वत्सले...' कम्युनिस्टांच्या भौतिक जडवादाच्या आड येत नव्हते किंवा काँग्रेसच्या 'सेक्युलॅरिटी'च्या आड रामकृष्ण मिशनची उपासना, आर्यसमाजाचे होम येत नव्हते. एक वैविध्याचे पण एकत्वाचे उत्साहित करणारे प्रदर्शन होते ते. गंमत म्हणजे RSS कँपवर दररोज धान्याची पोती, बिस्किटे, ब्रेड घेऊन सरकारी ट्रक यायचा. 'काम करताय ना, घ्या मग !' असे म्हणत. आन्ध्रात वेंगलरावचे काँग्रेस सरकार (त्या वेळेला नुसती काँग्रेस होती) होते. त्यांचो RSS ला सक्रीय भरघोस मदत. वादळाचं कर्तृत्व !

**एक वैविध्याचे पण एकत्वाचे उत्साहित करणारे प्रदर्शन होते ते !**

रात्री जेवण झाल्यावर 'टॉप केडर'ची कार्यालयात 'इमर्जन्सी मीटिंग झाली. मोहन, गिरीश, अनंतराव अभंग, सुहास जोशी, अजित कानिटकर, भाऊसाहेब घाटे, आप्पा डाखवे, विवेक कुलकर्णी आणि मी. काम कसे करायचे? रचना कशी करायची? आपण ३५ च जण आहोत. हजारो जणांचे अश्रू पुसायला आपले हात मर्यादित आहेत. मग मर्यादित शक्तीचा जास्तीत जास्त वापर कसा करायचा? गिरीशने सांगितले की, आता प्रेतांची विल्हेवाट लावण्याचे काम एकूण कमी आहे. इतर रचनात्मक कामाकडे लक्ष द्यायला हवे...कसे? मग पाच गटांनी पाच गावे घेतली. दिवी तालुक्याचा नकाशा होताच. ही गावे एकूण अत्यंत अंतर्गत भागातली. मुद्दाम अशी दूरस्थ खेडी निवडण्याचे कारण मदतकेंद्रांच्या जवळच्या गावात जास्ती होण्याइतकी मदत पोहोचते; पण आतली गावे कोरडीच रहातात.

आणि नुसते आज या गावात, उद्या त्या असं उडतबागडत काम करायचे नाही. एकच गाव एका गटाने जणू दत्तकच घ्यायचे. रोज तिथेच कामाला जायचे. लोकांना दिलासा द्यायचा आणि गाव पुन्हा वसवायचे.

हंसलदेवी, पालकायत्तप्पा ही एका रस्त्यावर पाच आणि सात मैलांवरची गावे आणि लिंगारेड्डी पालेम, चेन्नागोडमोटु, पेद्दा-गोडमोटु ही दुसऱ्या एका रस्त्यावर तीन, पाच, सात मैलांवरची गावे. हे 'चेन्ना' आणि 'पेद्दा' म्हणजे आपल्याकडच्या खुर्द, बुद्रुकसारखे; पण खुर्द वडगाव-सिंहगड रस्त्याला आणि बुद्रुक मुंबई रस्त्याला असला उतपटांग प्रकार नाही.

सकाळी पाचला उठून उपासना. उपासना चालू असताना सूर्य हळूहळू वर यायचा. इंचइंच उजळत जायचा. हा प्रकाश खरोखरच 'आमुच्या बुद्धीला प्रचोदना देऊन' जायचा. मग थोडेसे खायचे आणि निघायचे.

अजून वादळाचा अस्सल नमुना पाहिला नसल्यामुळे जरा विनोदी 'मूड' होता. त्यात एकजण म्हणाला, 'परमेश्वर पहातो कुठला भाग पापी आहे ते आणि बरोबर लेव्हल करतो!' परमेश्वर लेव्हल करतो या कल्पनेवर हास्याचा एकदम स्फोट झाला. वादळाचे हे विश्लेषण कोणालाच पसंत नव्हते; पण कित्येक स्थानिक लोकांची खरोखरच अशी समजूत होती.

जसजसे पुढेपुढे जायला लागलो तसतशी ही परमेश्वराने केलेली लेव्हल चांगली जाणवायला लागली. शिवाय लेव्हल करायला हा प्रदेशही सोपा, भुसभुशीत आहे. दोन्ही बाजूंना प्रेते जळत होती. जनावरांची. अर्धवट जळलेल्या प्रेतांचा कुबट वास येत होता. शिंगे, दात, हाडे इकडे तिकडे विखुरलेली. मधेच क्वचित एखादे फुगलेले प्रेत दिसायचे.

मग एकदम वातावरण बदलले. झपझप पावले ठरलेल्या गावाच्या दिशेने पडायला लागली. मध्ये चिखल...काटेकुटे...झाडेझुडपे... रस्ता बेताचाच...नाले आणि कालवे दर फुटाफुटावर. लांब गाव दिसायला लागले. पट्टागोडमोटू.

एवढ्यात गचकन् पाय थांबले. डाव्या हाताच्या नाल्यात पालथ पडलेले एका स्त्रीचे प्रेत. ही वेळ येणार हे माहीत होते. त्यासाठी मन तयार करत होतो. तेवढ्यात हे! अचानक मन शांत झाले. नाल्यातने जाऊन स्ट्रेचरवर ते प्रेत आणले. पाय स्ट्रेचरवरून लोंबत होते. पंधरा दिवस पडून कुजलेले होते ते प्रेत आणि नाल्याच्या काठावर बसून आई रडत होती. मुलीच्या अशा जगावेगळ्या अंत्यविधीला आई उपस्थित. बरोबरीचा दुभाषा तिच्याशी बोलतो. फुटलेल्या धरणासारखी ती बोलत सुटते. आम्हाला भाषा कळत नाही. पण वेदना समजते. ती वीस वर्षांची कन्या. नवविवाहीत. वादळाच्याच दिवशी सकाळी विजयवाड्याला Typist ची नोकरी मिळाल्याची तार मिळाली होती, पण मृत्यूनेच डिक्टेशन दिले. आईचे अश्रू वाढत जातात. आपल्यालाही काही तरी होणार असे वाटते. पण होत काहीच नाही. खड्डा पूर्ण प्रेत खड्ड्यात. वरून पसाभर माती आणि नंतर महाराष्ट्रातून गेलेल्या आम्हा बांधवांची त्या अनामिक भगिनीसाठी प्रार्थना—

असतो मा सद्गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतम् गमय—

सगळे भावविश्वातले खेळ. असतो मा सद्गमय! कसले सत्य? कुठले सत्य? एक वादळी रात्र सांगते आहे. 'सर्वम् दुःखम्, सर्वम् क्षणिकम्' मृत्यू हे एकमेव चिरंतन सत्य पण प्रार्थना सांगते आहे 'मृत्योर्मा अमृतम् गमय' म्हणजे मृत्यूच्याही पलीकडे काही आहे काय? दिलासा मिळाल्यासारखं वाटतं.

मृत्यूचं तांडव एवढंच कुठले! मग 'नाली' नावाच्या गावातली दीड हजार वस्ती गडप! मंदापाललम्मध्ये पाचशे लोकांनी चर्चशाळेत आश्रय घेतला होता. शाळेसकट लाटेबरोबर सगळे ईश्वरदरबारी रवाना!

मुंबईला नोकरी करणाऱ्या गॅब्रिसलचे चाळीस जणांचे कुटुंब आम्ही त्याच्या घराचे काम करताना त्याची पत्नी आणि वृद्ध माताच शिल्लक होती. किती हजार गेले पत्ताच नाही!

सगळेच भयंकर. नाल्यात किनाऱ्यापाशी अडकून पडलेली दहाबारा प्रेते. एका झाडावर उभेच्या उभे लटकलेले एक कलेवर.

साठ कोटींच्या या भारतवर्षात जीवन स्वस्त आहे माहीत होते. पण मृत्यूही, विध्वंसही इतक स्वस्त! अजून सगळी चित्रे मनःपटलावर कशी लख्ख आहेत. गुडलक चौकात झालेल्या अपघाताची बातमी चुकचुकणारे आम्ही......

संध्याकाळी गप्पा मारताना एक मुलगा भराभर म्हणाला, 'जीवन किती छोटे, अनिश्चित आहे. मग आहे हे जीवन सत्कारणी लावायला हवे एवढे मला समजले.' आता जीवन छोटे आहे तर खा, प्या, मजा करा असं त्याला का वाटले नाही? माहीत आही.

अर्थात् हे सगळे विचार नतर. त्या वेळेला वाटले होते प्रेत पाहून काही तरी होईल. आपला बांध फुटेल. धैर्याचा आव गळून पडेल, पण झाले प्रत्यक्षात काहीच नाही. सगळे कसे ठरल्याप्रमाणे, भावनावेग नाही, अश्रू नाही, कर्तव्य फक्त कर्तव्य! खिजवणाऱ्या सैतानाशी टक्कर.

मग वाटेवर जनावरांच्या प्रेताचे तर ढीगच्या ढीग. दावणील बांधलेले असतानाच मेलेले. एका मोठ्या टोपलीत पडलेली दोन प्रेते. आणखी किती तरी!

पृष्ठ १५ वर

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरंदरे

# शहा गेला तरी पुढे अंधारच आहे...

आधुनिकीकरणाचा लादलेला वेग न झेपल्याने व त्याबरोबरच संस्कृती व रूढी ह्या जैसे थेवादी शक्ती दुबळ्या पडल्याने इराणी समाजात आत्मसंदेह निर्माण झालेला आहे. ज्या ऐतिहासिक, भौगोलिक व धार्मिक संदर्भात इराण आहे, त्यालाही तो धरून राहिलेला नाही. त्यामुळे सध्या जी खळवळ माजलेली आहे तिचा केवळ शहाच्या विरोधी या दृष्टीने अभ्यास करणे योग्य होणार नाही. Nihilism चा एक चिंतनीय प्रवाह अतिसंपन्न पाश्चात्य देशात रूढ होऊ पहात आहे. पश्चिम जर्मनीतील बादर माइनहोक किंवा इटलीतील रेडब्रिगेड या तशा दहशतवादी आणि कोणताही विधायक कार्यक्रम नसलेल्या संघटना आहेत. इराणमधल्या सध्याच्या जाळपोळीच्या वार्ता वाचताना त्यांचीच आठवण व्हावी.

परंतु सध्या तरी इराणचा शहा हेच प्रमुख लक्ष्य आहे. गेल्या आठवड्यातील एक बातमी त्या दृष्टीने महत्त्वाची आहे. इराणच्या शहाने मुलांबाळांसह पलायन केल्याच्या या वार्तेचा नंतर त्यांच्या या देशातील वकिलातीकडून निषेध करण्यात आला; परंतु आता ती वेळ शहावर येणार की काय, असे खात्रीने वाटू लागलेले आहे.

या वर्षाच्या जानेवारीमध्ये विद्यार्थ्यांचा एक किंचित शहाविरोधी मेळावा पोलिसांनी निर्घृणपणे झोडपला आणि गेल्या अंकातील लेखात सांगितल्याप्रमाणे कोठारात काडी पडली.

या सगळ्या प्रकाराची गंभीरता शहाला तेव्हा जाणवली नाही. सिंहासनाची ऊंचच अशी होती की, जनविराटाचा असंतोष शहापर्यंत बराच काळ पोचलाच नाही. मिलिटरीच्या, आपल्या ताकदीवर तो पूर्णपणे विश्वसून होता. प्रथमतः धर्मलंडांचे अतिरेक असे स्वरूप जाहीर करून आंदोलकांवर तो शिक्का मारण्यात आला. मात्र अल्पावधीतच अति डाव्या शक्ती– (यांना रशियाची फूस असावी असा तर्क करायला भरपूर जागा आहे.) सुद्धा अति उजव्या शक्तींना सामील झाल्या. तीच वेळ विरोधकांना फोडण्याची होती. विरोधकांची संघटित शक्तीही कमी मानण्याची घोडचूक शहाने केली आणि विनाशकाले विपरीतबुद्धिः व्हावी तसा तो या चिखलात अधिकाधिक रुतत गेला.

**अमेरिकेची भूमिका :** शहाला मूर्खांच्या नंदनवनात ठेवण्यामध्ये अमेरिकेचा सिंहाचा वाटा आहे. इराण ही जवळपास अमेरिकेची नववसाहत (Neocolony, कम्युनिस्ट शब्दवंबाळाप्रमाणे) होऊ पहात होती; परंतु स्थानिक असंतोषाची कारणमीमांसा व खोलवर गेलेली पाळे-मुळे अमेरिकनांना शोधता आली नाहीत. इराणच्या शहाच्या त्या वैभवी दिवसांमध्ये कारखानदार मोठ्या आत्मप्रौढीने 'आमच्याकडेसुद्धा संप होतात' असे सांगत असत. जणू काय संप होणे हेही प्रागतिकतेचे लक्षण होते ! हे संप जसे बेतलेले असत, तसाच समाजजीवनाच्या पृष्ठभागावर व्यक्त होणारा हा असंतोष लुटुपुटीचा आहे असे अमेरिकेला आधी वाटले. त्यामुळे सरकारने सारे काही आलबेल आहे, असे गृहीत धरून कित्येक हजार कोटी डॉलर्सची नवी शस्त्रसामग्री पुरवण्याचे करार केले. आता पंचाईत अशी झालेली आहे की, ही शस्त्रसामग्री किंवा यंत्रसामग्री रवाना तर झाली आहे; पण पैसे परत मिळतील का नाही याची काहीच शाश्वती नाही.

अमेरिकन शासन आणि सी. आय. ए. या दोघांच्यात आता एकमेकांवर पेचाचे खापर फोडण्याची चुरस लागलेली आहे. कार्टर तर केवळ बळीचा बकरा शोधत वेडापिसा झाला आहे. C. I. A. वर त्याने बराचसा दोष ढकललाच आहे. इराणच्या अंतर्गत परिस्थितीबाबत अमेरिकन सरकारला पूर्णतः गाफील ठेवल्याबद्दल त्याने एका वार्ताहरपरिषदेत आडूनपाडून CIA लाच वेठीस धरले. CIA ने आपले अंग झटकण्यासाठी सचिवालयानेच इतकी बेफिकीर भूमिका घेतली की, आम्ही इशारे देऊनही ऐकले गेले नाही, असा युक्तिवाद सरकवला. अजून काही काळ हा संघर्ष धुमसत रहाणार हे नक्की.

पण दरम्यान लोकशाहीचा शंख फुंकणाऱ्या अमेरिकन सरकारला सरळ लष्करी सरकारला पाठिंबा देऊन निष्पाप नागरिकांच्या रोज अंदाजे पाचशे या प्रमाणावर होणाऱ्या हत्येकडे जाणूनबुजून डोळेझाक करावी लागत आहे. यामुळे तद्देशीयही सरकारवर व्हिएतनाम प्रकरणाप्रमाणेच भडकल्याचे नजीकच्या भविष्यात दिसल्यास आश्चर्य वाटणार नाही.

**लष्कर :** जरा बऱ्यापैकी वस्ती असणाऱ्या छोट्या शहरांपर्यंत आता हे दंगलीचे लोण पसरले आहे. अजूनपर्यंत शहा लष्करावरच विसंबून आहे. एकदा वाटाघाटींची वेळ स्वतःच्या उद्दामपणाने घालवल्यावर त्याच्यापुढे दुसरा पर्यायच राहिला नाही. लष्कराला त्याने आणि आधी त्याच्या बापाने पुरेसे पोसून ठेवलेले आहे. शहा गेला तर ही सगळी बांडगुळेही छाटली जातील, यात तिळमात्र शंका नाही. लष्कराचे अगदी वरचे अधिकारी त्यामुळेच शहानिष्ठ आहेत. मात्र खालच्या दर्जाच्या व प्रत्यक्ष युद्धभूमीशी (म्हणजे रस्त्यांशी) संबंधित असणाऱ्या सैनिकांचे नीतिधैर्य मात्र हळूहळू खचत असल्याच्या महत्त्वाच्या बातम्या येत आहेत. ताब्रिझ, इस्फहान, शिराझ (इथला जागतिक कलामहोत्सव रद्द करण्यात आला) आणि खुद्द तेहरान यामध्ये लष्कराची गस्त चालू आहेच. शिवाय तेलाचे प्रमुख केंद्र अबादान इथेही लष्कर देशभरपेक्षा मोठ्या प्रमाणात आहेच. रस्त्यावर दंगा करणारा दिसला की गोळ्या घालण्याचे आदेश केव्हापासून अंमलात येतच आहेत; पण तेहरानमध्ये परवा फारच सूचक घटना घडली. **आपल्याच भाईबंदांवर गोळ्या घालण्याऐवजी चार सैनिकांनी**

**आयत्या वेळी स्वतःवर गोळ्या झाडून आत्महत्या केली!** असे प्रसंग तुरळक असले तरीही बदलत्या वाऱ्याची ही चिन्हे आहेत. एकदा लष्करात हे नीतिधैर्यहनन सुरू झाले की, त्याला पसरायला वेळ लागत नाही.

यावर उपाय म्हणून, देशाच्या दूरदूरच्या कोपऱ्यांमध्ये आधी एकत्र असणाऱ्या सैनिकांच्या तुकड्या विखरून ठेवण्यात आल्या आहेत. त्यांच्या सतत बदल्या केल्या जातात आणि वारंवार पुनर्रचना केली जाते. सैनिकाला आपल्या मूळ गावापासून शक्य तितक्या दूर पाठवण्यात येते. तरीही लोकांच्या एकूण हत्येची संख्या पहाता परदेशी सैन्याशी लढण्यासाठी तयार असणारे लष्कर शहाशी फार काळ इमानदार राहील असे दिसत नाही.

**तेल-उद्योग :** इराणच्या नाड्या तेल-उद्योगाच्या हातात आहेत. एक नोव्हेंबरपासून अबादान, खर्द इस्लाद, बंदर शाहपूर, बंदर महशर या ठिकाणचे सुमारे चाळीस हजार तेल-कामगार संपावर गेले आणि शहाच्या तोंडचे पाणी पळाले. रोजचे सहा कोटी डॉलर्स या तेलामुळे सरकारच्या खजिन्यात पडतात. तेल थांबले की इराण थांबला. दररोज ५० लाख बॅरल्स इराणमधून बाहेर पडतात. या साऱ्यावर एकदम गदा आली. कामगारांच्या मागण्या पुढीलप्रमाणे होत्या— १. पगारवाढ, २. मार्शल लॉ उठवणे, ३. Savak ह्या अंतर्गत गुप्त-हेरसंघटनेचा प्रमुख नेमाहुल्ला नासिरीची चौकशी. त्यातला पगारवाढीचा प्रश्न पटकन सुटला; पण संप चालूच राहिला. Savak चा हा कुप्रसिद्ध प्रमुख, ज्याने अनेक नवे छळाचे प्रकार शोधून काढले तो पाकिस्तानात इराणचा राजदूत होता.

**शहाचा निक्सनी अवतार :** देशभर उसळलेल्या असंतोषाचे प्रमुख कारण अर्थातच शहा, त्याचे नातलग व प्रत्येक सरकारी खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेला प्रचंड, अतिप्रचंड भ्रष्टाचार हे आहे. एकदा आपल्या गळ्यापर्यंत पाणी येऊ लागल्याचे पहाताच शहाने आयुष्यभर ज्यांनी (काळ्या कृत्यात) साथ दिली त्या एकेका सहकाऱ्याचे बळी द्यायला सुरुवात केली. यात पहिला पडला तो उपरिनिर्दिष्ट नेमातोल्ला नासिरी. हा तेरा वर्षे SAVAK चा प्रमुख होता. शहाचे राजकीय विरोधक अदृश्य करणे हे काम त्याने चोखपणे बजावले होते. त्याचे बक्षीस त्याला शहाकडून मिळाले. याची तुरुंगात रवानगी होऊन चौकशी-आयोग नेमण्यात आला. आता आजवरच्या सर्व विरोधकांच्या हालअपेष्टांची व मृत्यूची जबाबदारी त्याच्यावर टाकण्याचा डाव आहे.

तेरा वर्षे पंतप्रधान असणारा अमीर अब्बन होवेदा यालाही नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात रहात्या घरी घटक करण्यात आली. नातेवाईकांसाठी प्रचंड लूट जमा केली, असा त्याच्यावर आरोप. हा १९६४ पासून १९७७ पर्यंत पंतप्रधान व शहाच्या 'खास' माणसांपैकी एक प्रमुख होता. यासिनी हा उपपंतप्रधान इराणच्या तीन काचकारखान्यांचा मालक. त्याला काचेच्या किंमती सात पटीने वाढवून अमाप पैसा उकळण्याच्या आरोपाखाली धरले आहे.

याशिवाय स्वतः शहाचे जवळचे चौसष्ट नातलगही या सर्पसत्राखाली आलेले आहेत. त्यांची चौकशी जमालुद्दिन अखारी हा इराणचा प्रख्यात कायदेपंडित करील.

आपण स्वच्छ आहोत, न्यायनिष्ठुर आहोत आणि जवळच्यांनाही भ्रष्टाचाराच्या शिक्षा देऊ अशी इमेज तयार करायची, हा शहाचा डाव आहे. बरोबरच्यांचे हात बरबटलेले असतील, माझे नव्हेत, हा अगदीच इंदिरा गांधी-स्टाइल अॅप्रोच आहे. निक्सनने जसे वॉटरगेट डोईजड होत-आहे, हे दिसल्यावर हाल्डेमन आणि एर्लिशमनला तोंडघशी पाडले, तसेच शहाने आपली कातडी बचावण्यासाठी भेकडपणे साथीदारांना संतप्त जमावापुढे टाकले आहे; पण याने फसण्याइतके लोक आता मूर्ख नाहीत. 'इन्द्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा' हाच त्यांचा आक्रोश आहे.

टी. व्ही. वर, रेडिओवर शहाचे भाषण असले तर लोक आता तुच्छतेने हसतात आणि एखाद्या वेड्याकडे पहावे तसे टी. व्ही.वरच्या शहाकडे पहातात. यावरून त्याच्याबद्दल किती कडूपणा साठलेला आहे हे दिसते. विद्यापीठातून त्याचे पुतळे केव्हाच फोडण्यात आले, त्याच्या प्रतिमांच्या होळ्याही झाल्या. आता त्याचीच आहुती पडणार असा रंग दिसतो. अर्थात तो तेवढा धूर्त आहे. तो पळून जाऊन आजवर जमवलेल्या प्रचंड मालमत्तेवर कित्येक पिढ्यांची तरतूद करून ठेवू शकेल.

**इराणचे भवितव्य :** मात्र इराणचे भवितव्य काय हा अनुत्तरित, संदिग्ध प्रश्न आहे. सध्या हेच एकमेव लक्ष्य असल्याने तो उडाल्यानंतर, प्रेशर व्हॉल्व उडाल्यानंतर वाफ एकदम मोकळी होते तसे होईल. एक तर मार्क्सिस्ट आणि इस्लामिस्ट यांचे जमणे अशक्यच. परत पडद्यात चला न् तीनदा नमाज पढा, रोजे करा हे समाज ऐकणार नाही. तेव्हा, नंतर जी यादवी या दोन शक्तींच्यात सुरू होईल ती अक्षरशः भयानक असेल. आज रस्तोरस्ती मुडदे पडतातच आहेत, ते घरोघरी पडायला लागतील.

मात्र एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, ती म्हणजे या दोनही शक्ती अजून असंघटित आहेत. सध्या आयेतुल्ला खोमेनी हा धर्मगुरु तरी इस्लामिक शक्तीचा वादातीत नेता आहे. तसा मार्क्सिस्टचा कोणीच निश्चित नेता नाही. 'नॅशनल फ्रंट' ही विरोधी पक्षांची आघाडी वस्तुतः अशा वेळी बफर म्हणून फार उपयोगी ठरू शकली असती. विविध पक्षांची आघाडी असल्याने ती मध्यममार्गी होती; परंतु तिची शक्ती फार क्षीण झालेली आहे.

डॉ. अली अमीन हा पूर्वीचा थोड्या-फार गटस्चा पंतप्रधान होता. त्याला शहाने परत पाचारण केले होते; पण त्याने नकार दिला आणि म्हणून गुलाम रेझा अझरी याच्या नेतृत्वाखालचे सरकार, पहिले लष्करी सरकार अस्तित्वात आले. त्यात नऊ जनरल्स् आणि बारा नागरी प्रतिनिधी आहेत, तेव्हा लष्कर ही एकच शक्ती आज देशात संघटित आहे. प्रश्न कोण जास्त काळ टिकतो याचा आहे. शहा आणि लष्कर विरुद्ध जनता. जरी शहा आणि लष्कर जिंकले, तरी शहाला पूर्वीचे स्थान प्राप्त होणे अशक्य आहे. कारण लष्कर स्वतःची किंमत सत्तेत प्रचंड वाटा घेऊन वसूल करणार हे नक्की. तेव्हा शहाची स्थिती नामधारी राजाची, राहिली तर रहाणार. जनता म्हणजे या दोन प्रमुख प्रवाहात झुंज. संजाबी हा ७३ वर्षांचा धूर्त इसम सध्या नॅशनल फ्रंटचा नेता आहे. तो तुरुंगात आहे. त्याला मागच्या महिन्यात पंतप्रधानपदी येऊन संयुक्त सरकार बनवण्यासाठी शहाने बोलावले होते; पण त्याने ते फेटाळले. तेव्हा शहानंतर इस्लामच्या नावाखाली लष्करी सत्ताच परत येणे अशक्य नाही.

रक्तपात भरपूर झालेला आहे; पण क्रांतीऐवजी हे अधिक वाईट सत्तांतरच शक्य दिसते.

लष्करातील कर्नल किंवा तत्सम दर्जाचा अधिकारी बंड पुकारून त्याने शहासकट वरच्यांना गचांडी देणे असंभव नाही. लष्कराचा त्याला बऱ्यापैकी पाठिंबा मिळेल. कारण खालचा सैनिक आता कंटाळला आहे. लिबियामध्ये कर्नल गदाफी किंवा पाकिस्तानात झिया उल हक् जसे इस्लामच्या रक्षणासाठी मधूनमधून बांग देत उभे आहेत (झिया उल् हक् तेवढा भक्कम नाही), तसाच इराण-मध्ये नवा लष्करी अधिकारी येणे कठीण नाही. लष्कराचे मार्क्सिस्टांशी जमणार नाही. परत ते असंघटित. इस्लामच्या नावाने उद्घोष केला की, एक प्रमुख शक्ती आपलीशी झाली; पण हे जे सत्तांतर (जर तसे झालेच) होईल ते इराणला फार महागात जाईल.

आजवर झालेले नुकसान कित्येक हजार अब्जांच्या घरात जाईल. पुनर्निर्माण करण्यासाठी लष्कर हो जास्तीत जास्त Status Quo कायम ठेवणारी शक्ती नालायक. अक्षरशः राखरांगोळी झालेल्या समृद्ध देशाला परत वर आणणे हा विनोद नाही. जर 'इस्लामिक मार्क्सिस्ट' सत्तेवर आलेच तर अंतर्गत बंडाळी परत माजेल; पण त्या वेळी रशियाची चांगली मदत धर्मलंडाविरुद्ध मार्क्सिस्टांना मिळेल. तरीही ज्या मूळ प्रश्नावरून ही दंगल सुरू झाली ती या ना त्या स्वरूपात जिवंतच रहाणार.

लोकच एकदा विरुद्ध उठले की, अमेरिका काय न् ब्रिटन काय, कोणीच सरकार वाचवू शकत नाही, हे चिरंतन सत्य परत एकदा प्रकाशात आले आहे. शहाची बाहेरच्या देशात असणारी प्रतिमा फारच उजळ आहे. त्याच्या देशात आज तो सगळ्यांचाच शत्रू झालेला आहे. आजवरच्या सगळ्या प्रगतीचा एकमेव कर्ता असे त्यानेच लोकांना पाठ होईपर्यंत सांगितले. आता या अधोगतीचाही तूच कर्ता, असे लोक म्हणू लागल्यास नवल नाही.

सुरवातीला म्हटल्याप्रमाणे आत्मसंदेहातून ही चळवळ फोफावली. संदर्भन्यूनतेने तिला खतपाणी घातले. जोपर्यंत आपला रीदम (Rbythm) समाजाला सापडत नाही तोपर्यंत हा नाश होतच रहाणार. परत आज कोणी विचार करण्याच्या मनःस्थितीतही नाही. माणसे मारल्याने असंतोष दडपता येत असता तर जगाचा इतिहास बदलला असता. तीच तीच चूक शहा परत परत करत आहे. एका व्यक्तीला देशाएवढा मोठा मानल्याने होणाऱ्या परिणामाला समाजाला तोंड द्यावे लागणार आहे. सर्व समस्यांचे शहाचा विनाश, हे उत्तर नाही. ही वस्तुस्थिती पचवणे आज तोल सुटलेल्यांना जड जाणार आहे. त्या दरम्यान जाणाऱ्या प्रत्येक दिवसाबरोबर भयचकितपणे सभोवार पहाण्याखेरीज सामान्य इराणी काहीच करू शकत नाही. शेवटी अगतिकतेने तोही यात ओढला जाणार. शहा हे एकच लक्ष्य असल्याने परिस्थिती आज सोपी आहे, असंतोषाला Channel मिळालेला आहे. पुढे मात्र अंधार आहे.

शहाला जावे लागणार हे मात्र उघड आहे. कारण शेवटी

चाहे कितनीही कठिन हो
चाहे कितनीही अडिग हो,
हर नदीकी राहसे
चट्टान को हटना पडा है। □


## तीन राजहंस प्रकाशने

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू । चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू । सात रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट । सहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

कथा

# फरपट

## विष्णु गुंजाळ

...तिचं सारं आयुष्यच मुळी असं फरपटत जाणार आहे. तो हालहाल करून मारील तिला, तेव्हा त्याचं मन शांत होईल...

कोण ? कुणाचं आयुष्य ?

हे गृहीतच होतं !

काय ?

हेच, तिचे असे हाल होणार आहेत. तो तिला असाच छळणार आहे.

कुणाबद्दल बोलते आहेस तू ?

तुम्हाला आपली ती सुरती गाय आठवते ?

हं. तिचं काय ?

आप्पांनी मोठ्या हौसेनं गाय घेतली. भरपूर दूध नि दुसरं म्हणजे गाय एकदम देखणी. वासरं कशी झाली असती ! विकणारानं का उगीच विकली असेन ? विचारा अडला असेल. अन्यथा ती बाजारात येतीच ना. आप्पांनी गाय बरोबर हेरली आणि थोडक्यात सौदा पटविला; पण घेताना थोडा तरी विचार केला का की, असलं सुकुमार जनावर आपल्या गोठ्यात टिकेल का ? त्याला आपलं हवामान मानवेल का ? आणली गाय नि दिली सोडून गोखाडीला ! तुमची खडकाळ, दगड-धोंड्यांची रानं. ४–८ दिवसात गाय सुकली. तिनं खाणंपिणं टाकलं. शेवटी हालहाल होऊन बिचारी मेली. मेली की नाही ?

हो, मेली !

आता याला जबाबदार कोण ?

म्हणजे तुला काय म्हणायचं ?

तुम्ही लोकांनी मारलो ती गाय ! असली जनावरं घ्यावीच का म्हणते मी ? खडकावर उभी करायची नि चरवी घेऊन दूध काढायला बसायचं. नुस्त्या वैरण-काडीशिवाय काय आहे हो तुमच्याकडं जनावराला खायला ? सुरती गाय सुकुमार, तसं तिचं खाणंही ब्राह्मणी. मऊमऊ विलायती घास. सरकी, पेंड !

आमच्या रानाला असली जनावरं टिकत नाहीत.

घेताना कळत नाही ?

आमची आपली पेटंट 'मळखाऊ पण टिकाऊ' जनावरं !

मांजरपाटछाप !

बरोबरच आहे.

तेच म्हणते मी. अशा जनावरांचा तळतळाट घ्यावा का म्हणते मी ? म्हणून तर अशी आयुष्याची फरपट होते. एखाद्याच्या मुलीची अशी फरपट करायची तुम्हाला काय अधिकार आहे ? कोण समजता तुम्ही स्वतःला ?

आम्ही खानदानी पाटील !

चिमणी कोकली तर दाणा आहे का घरात ? नुस्तेच नावाचे पाटील !

असं. म्हणजे तुला राग पाटलांचा आहे. तसंच गाईचं कौतुक बाईसाठी ! तुला वेडबिड तर लागलं नाही ना ? काय बडबडते आहेस तू ? मघापासून बघतोय मी. कुणाबद्दल बोलते आहेस तू ?

तुमचा तो जिवलग मित्र. एका ताटात जेवत होता तुम्ही, तो !

राम गायकवाड ?

हो. सकाळी काकू भेटल्या होत्या. त्या सांगत होत्या.

काय ते ?

हेच, तुमच्या कर्तबगार मित्राचे प्रताप !

काय झालं ?

काय बाकी राहिलं आहे ते विचारा !

मला नाही समजलं.

तुमचा मित्र म्हणे हल्ली मारतो बायकोला. पार हो वाळली आहे बिचारी, त्या मांगाच्या काचानं ! हालहाल चालविले आहेत त्यानं. अजून वर्ष काही झालं नाही लग्नाला. मी म्हणत नव्हते ?

काकूची भाची ना ती ?

हो. मारे परस्पर लग्न केलं. म्हणे काय तर प्रेमविवाह ! शहरातली शहांगी, नाजूकसाजूक मुलगी. काय पण कौतुक ..

तुम्ही हसताय् ..

हसू नको तर काय करू ? तू त्याचा तिरस्कार करीत जा नि त्याचाच विचार करीत रहा.

मला काय कारण कुणाचा तिरस्कार करायचं ? सहज विषय निघाला म्हणून म्हणते मी. माणूस बोलत नाही का ?

बरं केलंस.

तुम्हाला वाईट वाटणारच. मग सांगा की चार गोष्टी; पण तेवढं होणार नाही. उलट तुम्ही त्याचीच कड घेणार. जिवलग मित्र तुमचा. मराठी शाळेपासून दोस्ती ! त्याचे दोष तुम्हाला कसे दिसणार ? पण एक सांगून ठेवते. अंगापेक्षा बोंगा मोठा करू नये माणसानं. केला की अशी फरपट होते.

हीच तर गम्मत आहे.

कसली ?

तुझ्या त्या बोंग्याची !

म्हणजे ?

राम ज्या परिस्थितीतून, ज्या फॅमिलीतून आला त्याच परिस्थितीतून, त्याच समाजातून मीही आलो. आम्ही कसं शिकलो ते आमचं आम्हाला माहीत. आम्ही इथवर आलो हेच भाग्य ! तुला वाटतं तो अंगापेक्षा बोंगा मोठा करतो. त्याची कारणं तू शोधली आहेस ? मी इंजिनिअर झालो. तो साधा बी. ए. ! बिचारा नोकरी करून शिकला. स्वतःच्या हिंमतीवर लग्न केलं. आज तो नोकरीला लाथ मारून खेड्यापाड्यात हिंडतो आहे. समाजकार्य करतो आहे. असं फुलटाइम काम कुणी तरी केलं पाहिजे. तुला माहीत नाही. आपला समाज...

काही सांगू नका कौतुक. शिकलेली बायको करावी कशाला ? साधं तिचं पोट भरता येत नसेल तर...

शिकलेली बायको ! खेडोपाडी वणवण हिंडायची. तिची आबाळ होत असेल, रामला स्थैर्य अजून कसं ते लाभलं नाही. कुरबूर, धुसफूस होत असेल. मी नाही म्हणत नाही. एखादे वेळी राम वैतागूनही जात असेल.

तुझ्या म्हणण्याप्रमाणं तो बायकोला मारहाण करीत असेल... त्याचं पितळ उघडं पडलं आहे; पण मला असं वाटत नाही. शहरी मुलगी आहे. नोकरी करते आहे. तिला सराव नसेल, त्रास होत असेल, नवऱ्यानं जवळ रहावं. पैसे कमवावे. चांगला संसार करावा असं कुणा मुलीला वाटत नाही ? पण रामचा कल लहानपणापासून समाज-

कार्याकडं आहे. तो मुद्दाम शहरी बायकोला त्रास देण्यासाठी थोडाच असा वागत असेल? बायकोनं नवऱ्याचा कल पाहून वागायला नको का? आणि घडीभर आपण गृहीत धरू की, राम बायकोला मारहाण करतो. तिचे हाल करतो. ध्येयवादी माणसाशी संसार करणं चेष्टा नाही. ते एक दिव्यच आहे. रामला तू जवळून पाहिला नाहीस. त्याची लेक्चर्स तू ऐकायला हवीत. माणसं त्याच्यासाठी जीव टाकीत असतात, तुला कल्पना नाही. उगीच कुणी त्या फंदात पडणार नाही. स्वतःच्या संसाराची होळी करून राम आज जनजागृती करतो आहे. त्यांच्यासाठी चंदनासारखा झिजतो आहे. वेळेवर खाणं आहे की जेवण आहे? त्याचं कपडचालत्त्याकडं लक्ष नाही. रात्रंदिवस तो राबतो आहे. शेतकऱ्यांची अडली-भिडली कामं, प्रौढशिक्षण, त्यांच्या मुलांना नोकरीधंदा, कुणावर अन्याय झाला, बंड करून ऊठ. राम जिद्दी आहे. केवळ बायकोचं पोट भरणं एवढंच त्याला काम नाही. अनेक उद्ध्वस्त संसार त्याला उभे करायचे आहेत. आज समजा त्याच्या बायकोचे हाल होत असतील; पण दिवस पालटले आहेत आता. रामला चांगले दिवस येणारच नाहीत असं नाही. माणसात असतं त्यापेक्षा जास्त दाखवायची प्रवृत्ति असते. राम असेलही तसा; पण हा मनुष्यस्वभाव आहे. तुला तो मोठा बोंगा वाटतो. झपाटलेली माणसं ती. आपण कुणी तरी वेगळे आहोत, मोठे आहोत असं तुम्हाला वाटतं. खरं तर या लोकांचं तिकडं लक्षही नसेल. शाश्वत सुखं त्यांना कधीच मोहवीत नाहीत...

अहो, पण जे मुळातच नाही, ते आहे असं गृहीत धरून वाढवायचा अट्टाहास का म्हणते मी! चांगली नोकरी होती. नोकरदार बायको आहे. सुखानं संसार करायचा ते दिलं सोडून नि निघाले समाजकार्य करायला! आता हे उजेड पाडणार! त्या बिचाऱ्या मुलीचा काय दोष? की तिनं या तिरसिंगरावाशी लग्न केलं हा दोष?

हे बघ, आता तुझं-माझं भांडण होईल. एका दृष्टीनं त्याचं बरोबरच आहे.

काय बरोबर आहे? बायकोचे हाल करणं?

त्याच्या बायकोनं नवऱ्याचा कल पाहून वागायला नको? मिळतं-जुळतं घ्यायला नको? परिस्थिती पाहून वागायला नको? तुम्हा बायकांना वाटतं, सगळं कसं आराम, व्यवस्थित झालं पाहिजे.

मग काय चुकलं आमचं? नवऱ्याकडून आम्ही ती अपेक्षा करू नये?

अग, म्हणून तर खटके उडत असतील! तुम्हा बायकांना. नवरे म्हणजे काय वाटतं समजत नाही! त्यालाही काही ध्येय-धोरणं असतील, आशा आकांक्षा असतील. की केवळ तुम्हाला पोशीत रहावं?

लग्न कशाला करावं म्हणते मी?

फक्त नोकरी करून बायको–मुलांचे लाड पुरवण्यासाठी? तुमचं हे नेहमीचंच आहे.

एखाद्याला मोठं व्हायचं असेल तर काही काळ हाल–अपेष्टा सोसायला नकोत?

मग सोसा.

कोण आम्ही फक्त?

मग आम्हालाही कुठं नोकरी बघा.

आली मूळ पदावर. तुझं नाही म्हणत मी. रामचा पिंड...

अहो; पण तो खरंच मोठा होणार आहे का?

तो प्रश्न वेगळा; पण म्हणून त्यानं धडपड करायची सोडावी का? त्याला जे आवडतं ते तो जीव टाकून करतो...

म्हणूनच म्हणते मी. अंगापेक्षा बोंगा मोठा त्यानं करू नये. त्या बिचाऱ्या मुलीचे का हाल? तुला मरायचं, तू मर! स्वतःचा संसार नीट करता येत नाही तो दुसऱ्याचे संसार उभारणार!

म्हणजे भांडण आलंच.

येणारच!

मी म्हणजे तो नाही, आमची जात एक असली तरी स्वभाव भिन्न आहेत.

तुम्ही तर अगदी वाघ मारता आहात.

अग, मी वाघ मारीत नाही हेच तर खरं तुझं दुःख आहे. राम मला हसतो. तू तर नेहमीच हसतेस. उपहासानं मला हिणवतेस. रामसारखा फाटका माणूस, समाजात त्याची वाहवा होते. मी इंजिनिअर असून तुझ्या इच्छा–आकांक्षा पूर्ण करीत नाही. त्यामुळं तू चिडतेस. जे मुळातच माझ्यात नाही ते तू अपेक्षितेस. तुझ्या काकूच्या भाचीचे राम हाल करतो, तू चिडतेस!

ढोंगी आहे मेला!

बघ चिडलीस, ढोंगी सगळेच आहेत. मोठं म्हणवून घेण्यासाठी सगळेच ढोंग करतात. मीच असा एक प्राणी आहे की, मला माझ्या बायको-मुलाव्यतिरिक्त दुसरं जग नाही. म्हणून तर माझे सारे नातेवाईक नावं ठेवतात. भांडणापेक्षा अबोला बरा, म्हणून मी त्यांना टाळतो. सारे स्नेहसंबंध तोडून टाकले आहेत, असं केलं नसतं तर हाल माझेही झालेच असते. त्यात विशेष काय आहे?

तुम्ही असं कुजकं बोलू नका. तुमच्या नातलगांची, मी तुम्हाला बांधून ठेवलंय, मी तुम्हाला खरेदी केलंय, अशी तक्रार आहे. मी तुम्हाला साफ सांगते. तुम्ही तुमचे मुखत्यार आहात. तुम्हाला ध्येय, आशा-आकांक्षा असतील तर तुम्ही तुमचे निर्णय घेऊ शकता. मी काही तुम्हाला बांधून ठेवलेलं नाही.. काय हवं ते करू शकता तुम्ही! आयुष्यभर हेच ऐकत आले...

आणि शेवटपर्यंत तेच ऐकत राहणार आहेस; कारण तेवढा दम आता माझ्यात नाही आहे. कधीच नव्हता. मी आपला एक कौटुंबिक जिव्हाळ्याचं नाटक! तोच माझा जन्मस्वभाव, उगीच गुंजेला फुंकर घालण्यात काय अर्थ आहे?

मी काय करावं असं वाटतं तुम्हांला?

तू काहीही करू नकोस. माझं दुबळं आयुष्य चेतविण्याची ठिणगी तुझ्याजवळ नाही आहे. आयुष्यभर मी बोलणी खात आलो. कुणाला वाटायचं, मी सत्तेचा दुरोपयोग करावा, लाच खावी. खोऱ्यानं पैसा आढावा. कुणाला वाटायचं, मी वशिलेबाजी करावी! नातलगांची वर्णी लावावी. आयुष्यात मी फार भिऊन वागलो. फक्त पगारापुरती नोकरी केली. त्यामुळे दुरावले सगळे. मला नामोहरम केलं सगळ्यांनी. स्वतःचे निर्णय मी स्वतः घेतले नाहीत. मी काय दुसऱ्यांचं भलं करणार? उगीच दुसऱ्याला हसण्यात काय अर्थ आहे? तुला काय समाधान मिळत असेल तर मिळो! पण आपल्या हातून काही होत नसेल तर निदान दुसऱ्याला तरी हसू नये.

मी काय हसले कुणाला?

राम मोठा होणारच असेल तर स्वतःच्या कर्तबगारीवर होईल. आपल्याला त्याला मदत करता आली नाही तर निदान त्याला हसू तरी नको. समाजक्रांतीसाठी आज त्याची धडपड चालली आहे. स्वतःच्या हातानं तो स्वतःची फरपट करून घेतो आहे. त्याला का हे माहीत नसेल? कशासाठी धडपड असेल त्याची? वैयक्तिक सुखासाठी? परमेश्वर करो. त्याला उदंड आयुष्य मिळो. त्याचं स्वप्न साकार होवो.

राईचा पर्वत होत नाही, तसा गरीबाचा कधी राजा होत नाही! आपलं म्हणायचं,

पण ..कर्मदरिद्री मेले सगळे सारखेच! □

पुस्तके

# तळ्यातल्या साउल्या

## हळुवारपणाचा स्पर्श लाभलेल्या कविता

'तळ्यातल्या साउल्या' हा श्री. पुरुषोत्तम पाटील यांचा नवा कवितासंग्रह. पॉप्युलर प्रकाशनाच्या 'नवे कवी—नवी कविता' या मालिकेतील हा आठवा कवितासंग्रह. श्री. पाटील यांची कविता त्यांच्या रचनेमुळे, शब्दयोजनेमुळे आणि आशयाच्या नेमक्या अभिव्यक्तीमुळे आजच्या कवितांमध्ये उठून दिसते.

'तळ्यातल्या साउल्या'मध्ये पुरुषोत्तम पाटील निसर्गाचा, व्यक्तीचा अनुभव शब्दबद्ध करतात. तो शब्दबद्ध करीत असताना शब्दांना असणाऱ्या चित्रदर्शीत्वाचा [vidual quality] सुरेख वापर ते करतात. 'साउल्या'मधील अनेक कविता स्त्री-दर्शनाच्या आहेत, ही दर्शने कधी प्रियेच्या रूपात, कधी पत्नीच्या स्वरूपात, तर कधी मायेच्या रूपात साकार होतात.

'कशासाठी ओठी झुंजुमुंजु गीत
विकली मी प्रीत सांजवेळी'

असे म्हणत असताना पाटील दुसऱ्या एका कवितेत

'तुझ्या येण्यासाठी साठविले देणे
हातोहात घेणे देहस्वप्न'

असंही म्हणतात.

आपल्या प्रियेबद्दलची भावना व्यक्त करताना पाटील एक सुरेख चित्र उभे करतात. त्यातील भावना हळुवारपणे मांडतात. त्याला एक काव्यात्मक पातळी प्राप्त करून देतात.

संमिश्र आणि तरल स्वरूपाची अनुभूती व्यक्त करताना ते शब्दांच्या पातळीवर येतात; पण त्यांच्या चित्रदर्शित्वामुळे एक वेगळेच परिमाण त्या कवितेला लाभते.

'कोवळ्या मंजिऱ्या डोलती, डोलू दे
अंजिरी साडीला सुवास झेलू दे'

किंवा

'हातामध्ये जडला हार
रात उशाशी रडते आहे
काळ ताणला जरि ताऱ्यांनी
जखमी क्षण तो स्फुंदत राहे'

अशा कित्येक कविता या संग्रहात वाचायला मिळतात आणि म्हणूनच या कविता वाचताना वाचक अक्षरांवर रेंगाळत नाही. दोन ओळींमधील चित्र तो पाहू लागतो. आपल्या या कवितांच्या संदर्भातच श्री. पाटील 'शेवटचा दीस' या कवितेत एक दृष्टिकोन प्रकट करतात. ते म्हणतात,

'काय सोपे गाऊ आशयाचे सूर
शब्द माझे चूर अशक्यात
दाखवाव्या कैशा जखमा अडाणी
प्रीतीची कहाणी प्रेतासाठी'

या अशा जाणिवांप्रमाणेच भावानुभावांची चित्रे दाखवितानाही ते हळुवार होतात. खरे तर त्यांच्या या सर्वच कवितांना हळुवारपणाचा एक स्पर्श आहे.

पाटील यांची रचना ही रचनेच्या आहारी जाणारी नाही. ते ही क्षणचित्रे टिपताना रचनेला फार कमी वेळा महत्त्व देताना दिसतात. तरीही 'इतुके सोपे', 'तिष्ठत रहा' अशा काही कवितांत हा अट्टाहास दिसतो. कविता अनुभवत असताना आपण रचनेकडे विशेष लक्ष देण्याची गरज यामुळेच भासत नाही. आपण ती पूर्णपणे अनुभवू शकतो; परंतु अशा शब्दरचनेतसुद्धा पाटील काही शब्द हेतुपुरस्सर वापरतात. त्यांचा रचनेशी संबंध असतो.

रान तुझे
तुझेच
काटेरी भुलवे
भान तुझे
तुझेच
बेसावध मिरवे

किंवा

थरारे काचोळी ओळखीचा तीळ
नको घालू पुन्हा नजरेची शीळ'

या अशा कवितांबरोबर श्री. पाटील यांच्या कवितेत ते 'कंसांचा' वापर करताना दिसतात.

'निरागस हसू नये
असे खालच्या मानेने'

(...वळताना बोलू नये, सायवळल्या ओठाने!)

किंवा

टपोऱ्या डोळ्यातली संज्य तहान
(तू तर खळखळ लहान...)

हे कंसबद्ध शब्द कवितेचा परिणाम विशेष आकारवतात. हा अट्टाहास रचनेसाठीही असू शकेल; पण शब्दांची ही योजना मोहक असते खरी!

कवितेच्यापेक्षा तिला वेगळे परिणाम देणारी गोष्ट म्हणजे पुस्तकाची छपाई. पद्मा सहस्रबुद्धे यांचे सुरेख मुखपृष्ठ आणि शुभ्र पांढऱ्या कागदावर सुबक केलेली छपाई या पुस्तकाची एक जमेची बाजू म्हणता येईल.

पाटील शब्दांची निवडही नेमकेपणाने करतात. सायवळले ओठ, उद्धट बट, अरुवार अंधार, विवस्त्र चांदणी, घनदाट वासना यामुळे शब्दांना असलेले वजन वेगळेपणाने अनुभवायला मिळते. या कवितांमधून पाटील आपला स्वतःचा स्वतःसाठीचा संदर्भ उलगडवून दाखवतात; परंतु हा संदर्भ काही वेळेस प्रातिनिधिक स्वरूपाचा असतो. म्हणूनच अशी कविता अनुभवताना त्याला आपल्या अनुभवांची किनार येते. कवीला भावलेली भावचित्रं असे जरी या कवितेचं स्वरूप असले तरीही ती कविता फक्त पाटील यांचा संदर्भ घेऊन प्रकटत नाही, ती सर्वांचीच होते.

या कवितांवर कुणा इतर कवींचा प्रभाव दिसून येतो असे म्हणणे अन्यायाचे होत असले तरी रचनेवर, शब्दांवर कुणाकुणाचा परिणाम दिसून येतो! आणि म्हणूनच ही कविता सुबोधतेकडे वळते. कविता दुर्बोध असायला हवी, या मताचा मी नसलो तरीही कवितांमधून होणारे कवीचे दर्शन मात्र अपरिहार्य असते. 'साउल्या'मधे ते दर्शन धूसरपणे होते. ◘

—मुकुंद संगोराम

**तळ्यातल्या साउल्या** (कवितासंग्रह)
पुरुषोत्तम पाटील
पृष्ठे : ७६, मूल्य : ८ रुपये
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

# आंध्रानुभव : पृष्ठ ८ वरून

हे सगळे ओलांडत आम्ही गावापाशी जाऊन पोहोचलो. जिवंत राहिलेल्यांचे पहायला हवे ना ! जे गेले ते सुटले असे म्हणण्याइतकी यांची स्थिती हलाखीची. नजरेसमोर ते पेद्दा गोडमोटु. भारतातल्या पाच लाख खेडयांमधले एक. पडलेल्या विस्कळित झोपड्या दिसत होत्या म्हणून गाव म्हणायचे.नाही तर गावात काही चैतन्य, हालचाल जाणवतच नव्हती.'हट्ट करणाऱ्या पोराला बापाने खडाखड थोबाडीत माराव्यात आणि पोर गाल धरून हमसून हमसून रडत कोपऱ्यात शांत बसून असावे तसे वाटले गाव सुन्न, शांत.

एक सुरकुतलेला वृद्ध बांबूच्या ढिगाऱ्यात खुडबुडत काही तरी शोधत होता. ईश्वर जाणे. त्या रात्री वाहून गेलेले त्याचे नशीब शोधत असावा! बहुधा. आम्ही विचारतो, 'यन पेरें ती'. थरथरत सांगतो. 'सत्यलिंगम्'. आम्ही हातवारे करत विचारतो, 'सहाय्यो?' तो आसमंतात हात फिरवतो खिजवण्यासाठी. पहा काय मदत करा ताय ते इवलेसे हात तुमचे. पडकी घरे उध्वस्त शेते. त्यात तुरळक प्रेते. जबरदस्त वास, शिरावर ओझे असह्य व्हायला लागते. मग उसळून उठतो. नसेल कदाचित आमची ताकद माहितोय आमचे हात छोटे आहेत. पण आम्ही उभे राहू हे रचनेचे, कर्तृत्वाचे गीत गाऊ 'गली गुंगली है तो हम क्या अपने गीत मरोंडे ?'

पण सगळयात त्या सत्यलिंगम्चे ओझे असह्य होते. 'त्वचेचेच वस्त्र लपेटलेला हाडांचा सांगाडा' म्हणजे काय ते समजते. टचकन् डोळ्यात पाणी येऊ पाहते; पण ते आवरायला लागते. प्रेते पाहिली तेव्हा सुद्धा काही वाटले नाही...कुठली कुठली खबदाडीतली, झुडुपांमधली प्रेते उपसली. खड्डे खणले. नाल्याच्या पलीकडे पडलेल्या प्रेताखाली बांबू घालून काढताना ते कुजके प्रेत फुटले तर 'ते बघ लिव्हर आणि तो लार्ज इंटेस्टाइन' असा जीवशास्त्राचा अभ्यासही केला; पण हा जिवंत सांगाडा पाहिल्यावर मात्र दाटून आले.

हा भारतीय नागरिक. ही खरी भारताची नाडी. ती ज्याला गवसेल तोच या खंडप्राय देशाच्या समस्यांवर अचूक बोट ठेवू शकेल. त्या महात्म्याला ही नाडी सापडली होती. म्हणून त्याने राज्यकर्त्यांना बजावले होते, 'कोणतीही योजना करताना सामान्यातल्या सामान्य माणसाचा विचार करा!' आम्हाला सांगितले होते, 'खेडी सुधारा!' आम्ही मात्र हे दोन ऑक्टोबरला समारंभपूर्वक आठवून हरी हरी करीत बसलो अन् आता या गावाची समस्या उरावर वजन आणते.

सगळेच धुतले गेलेय. काय काय देणार ? इथे निदान घरे आहेत. पालकायतप्पा तर एक नाव म्हणून शिल्लक होते. ही अक्षरे एवढेच त्या गावाचे अस्तित्व. अजित कानिटकरला त्या गावात एक पडक्या घराच्या मातीच्या ढिगाऱ्याखाली एक लक्ष्मीची मूर्ती मिळाली ! तस्विरीखालची रांगोळीही सुरक्षित होती.

पहिल्या दिवशी ही व्यथा घेऊन सगळे परतले. अक्षरशः पाचवीला पुजलेले दारिद्र्य ! वादळाने त्यांचे काय विघडविले ? अनंतरावांनी एक अचूक वाक्य टाकले They have nothing to loose but poverty. खरे होते. एका ट्रंकेचा संसार.

दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी जोरात कामाला सुरुवात होते. रस्ते साफ करणे, तयार करणे...शिल्लक असलेल्या तुरळक प्रेतांची विल्हेवाट लावणे ..रोगराई पसरू नये म्हणून गावात सगळीकडे फिनेल, गॅमॅक्झिन टाकणे हे मुख्य काम.

पण एक लक्षात आले की, यांचे नेहमीचे जीवन सुरू व्हायचे तर 'घरकुल' आवश्यक आहे. भांडीकुंडी, कपडे, कंदील आणि बांबू ही लगेचची आवश्यकता. रस्त्यालगत असणाऱ्या खेड्यात व्यापारी लोक भांडी, ब्लॅकेटस् वगैरे वगैरे वाटून पुण्यकर्म करत होते ! पण वाटप-पद्धती म्हणजे ट्रक पुढे, लोक मागे अशी शर्यत आणि ट्रकमधून भांडी, कपडे फेकले जाणार. ज्याला जे मिळेल ते मिळेल. यामूळेच असल्या वादळे, धरणफुटी वगैरेनंतर काही जण पूर्वीपेक्षा श्रीमंत होतात. त्यामुळे 'भारताचे' प्रश्न उत्पादनाचे नसून समान वाटपाचे आहेत. हे लक्षात घेऊन आम्ही 'डावे' बनलो.

ही वाटपपद्धती अयोग्य आहे हे लक्षात घेऊन एक शिस्तबद्ध आखणी करण्यात आली. गावामध्ये गटांनी कुपने लिहून द्यायची आणि ती दाखवून कोटुरूच्या प्रबोधिनीच्या कार्यालयातून सामान घेऊन यायचे मग काय . उदा. 'दाश पोतराजु . एका घराचे बांबू, दोन पुरुषांचे, दोन स्त्रियांचे कपडेजोड. एक भांडीसेट. ही पद्धत इतकी नीट बसली की पुढे पुढे लोकच बरोब्बर 'साब चिठी ! असे विचारायला लागले. मोहन एक दिवस विजयवाड्याला जाऊन दहा हजार रु. चे बांबू भांडी, कंदील इ. सामान घेऊन आला.

हे सगळे काम करताना लोकांशी बोलणे, त्यांना दिलासा देणे हे तर मुख्य काम बरोबर दुभाषा असायचा; पण दोन माणसांना बोलायला दुभाषा लागतोच असे नाही.

B. Com. ला Indian Economics वर्षभर शिकताना वाटले नसेल एवढे खूप त्या दिवसात समजले. खेडी . त्यातली आमची माणसे शेते पाहताना प्रसंगी नाडीचे ठोके वाढले. आकडे डोळयांपुढे फेर धरून नाचले.

'पाच लाख खेडी'...समोरचे उद्ध्वस्त गोपालपुरम् गर्जत उठते. '८०% लोकसंख्या...' हात जोडलेला तो फाटका वृद्ध मोडकेतोडके बोलतो, 'साब...कुच नहीं बचा'...'शेतीप्रधान अर्थव्यवस्था...' अन् नजरेसमोरची. टेनिसनच्या 'डॅफोडिल्स' सारखी क्षितिजापर्यंत पसरलेली. पाण्यात भिजून पिवळी पडलेली, वाया गेलेली भ तशेते प्रश्नचिन्हे उभी करतात. खाऱ्या पाण्यात भिजल्यामुळे अजून एकदोनदा या सुपीक जमिनीत पीक येणार नाही म्हणे. या वर्षी येणार होते ते विक्रमी पीक होते.

हो. होते. हळूहळू 'त्यांना द्यायची आहे कुठे तरी कुशीची ऊब... वांझ दैन्यातून फुलवायचेत सौभाग्याचे मळे...' याचा अर्थ उलगडू लागतो. डोळ्यांत येणारे अश्रू आटतात आणि वेगळेच काही तरी चमकू लागते. त्या धुंदीतच आम्ही कामाला भिडतो.

कामाची धुंदी काही औरच. धुंदी चढविणाऱ्या इतर गोष्टी बाहेरून आत घेतात. प्रेरणा एवढी एकच गोष्ट अशी आहे की, जी आतून उसळते. धुंद करते. सकाळी सात वाजता खाऊन निघायचे.

८-१० किलोमीटर्स चालत जायचे, अनवाणीच. कारण चिखल. आदल्या दिवशी उद्याच्या कामाची योजना झालेली असते. त्याप्रमाणे कुणाच्या हातात फावडे, कुणाकडे कुदळ तर कुणी हातात कंदील सावरत चाललेला. एक जण थोडेसे खाद्यपदार्थ बरोबर घेऊन. त्याला म्हणायचे 'सोवळा.' त्याने इतर काही काम करायचे नाही. फक्त मध्ये दुपारी प्रत्येकाच्या तोंडात दोन दोन बिस्किटे आणि एक एक केक सरकवायचे. बस्स. हेच दुपारचे जेवण. पुन्हा काम सुरू. दिवस कलायला लागला की, माखलेले रापलेले चेहरे घेऊन सामान खांद्यावर टाकून परत ८/१० कि. मी. एक–दो– एक दो. सकाळी सातनंतर रात्री ८ वा जेवण. मध्ये हरिहरि; पण गाववाले हुषार. सूर्य डोक्यावर आला की, येऊन विचारतात 'खाना?' आम्ही त्यांना ऐकवतो, 'खाएगा तो काम कौन करेगा?' 'अरे नहीं भाई लोग. वोऽऽ बंबईसे आए हैं, हम तुमको खानेकोभी नहीं देगा?' असे ओले स्निग्ध वाक्य... मग कोणाकडून जेवणाचे आमंत्रण. कोणाकडून चहा-कॉफीचे. जेवण आम्ही नाकारतो. चहा किंवा कॉफी, चुरमुरे हा जसा एक अखिल भारतीय प्रसाद आहे, तशी चहा-कॉफी ही वैश्विक पेये आहेत; पण इथे समता. नाव काही दिले तरी गुळ घालून तयार होणारा द्रवपदार्थ दिसायला आणि चवीला एकच; पण त्यात भावना असते ना!

संध्याकाळी आल्यावर आंघोळी. त्यानंतर कामांची गटशः निवेदने. आज काय काम केले? कसे केले? काम करताना काय वाटले, रोज वेगवेगळी मुले बोलायची, वेगवेगळ्या अनुभवांचे कण.

चेन्नागोडमोडु. हे गाव मुसलमानांचे आमचे काम चालूच आहे. अचानक जमात–ए–इस्लामची मंडळी येतात आणि चक्क आम्हाला जायला सांगतात. 'ये गाँव हमारा है, हम अपने भाईयोंकी मदद करने आए हैं' सगळी गावे टिपून बरोब्बर यांना हेच 'भाई लोग' सापडले. सुहास त्यांच्या खांद्यावर सहज हात ठेवत म्हणतो, 'हम भी अपने भाईयोंकी मदद कर रहे हैं.' काम पुढे चालू.

किंवा पेद्दागोडमोटू. इथे सगळी ख्रिश्चन वस्ती. रोमन कॅथोलिक म्हणे! प्रिस्ट विजयवाड्यात. एका घरापाशी काम करता करता आम्ही मालकाला नाव विचारले, तर 'रामदास.' उडलोच. अरे तू ख्रिश्चन ना? उत्तर: 'जोसेफ क्रिस्तन नाम चर्चका नाम. हम रामदास.' बराच काळ चिंतन करायला हा अनुभव पुरावा.

माझ्याकडे 'तरुण-भारत'चे Press–message card होते. तो पैसे न देता कितीही लांब तार करायला पत्रकारांना दिलेला अधिकार असतो. अवनीगड्डाला येऊन ही तार करावी लागायची. दर दोन दिवसाआड कामाचे निवेदन पाठवायचे. एक दिवस पोस्ट ऑफिसात एक पाश्चात्य तरुण पोस्टमास्तराशी बोलत बसला होता. पोस्टमास्तर खुडबुडत उत्तरे देत होता. मी सहज चौकशी केली, तर तो निघाला ख्रिस एलिसवर्थ. पुण्याजवळील कल्याणच्या बंधाऱ्यावर फादर दलरींच्या बरोबर काम केलेला. प्रबोधिनीच्या आप्पा-अण्णांना तो चांगला ओळखत होता. त्याला मराठी येत होतं. हे कळल्यावर मी त्याच्याशी मराठीतूनच बोलायला सुरुवात केली. तर तो म्हणाला, 'मला चांगला मऱ्हाटी येत नाय!' मी म्हटलं, 'आम्ही तरी कुठे सुरुवातीला चांगले इंग्लिश बोलायचो? बोला की. आमच्या देशात उगलात तर आमची भाषा बोला.'

पण एकूण गोऱ्या कातडीचे अन् भुऱ्या केसांचे अफाट स्वागत व्हायचे या खेड्यांमधून. लोक हात जोडायचे, हात पसरायचे, पदर पसरायचे. दीनवाणे चेहरे करून उभे रहायचे अन् हे फोटो घ्यायचे. परदेशात ही चित्रे दाखवायला, 'बघा भारताची काय स्थिती आहे, बघा.' बी. बी. सी.चा वार्ताहर आला होता. विजयवाड्यातला एक सुशिक्षित प्रौढ त्याच्या ताटाखालच्या मांजरासारखा वागत होता. नम्र. दबून. हा बडबड करायचा. सगळ्या बोलण्यातून वार्ताहर एखादाच मार्मिक प्रश्न विचारायचा.

'ऑक्स फॉम'च्या अशाच एक प्रतिनिधी बाई आल्या होत्या. प्रबोधिनीचे 'ऑक्स फॉम'चे संबंध सांगितल्यावर त्या बोलायला लागल्या. त्या अशा एखाद्या संस्थेच्या शोधात होत्या की, ज्यांना पैसे दिले असता त्याचा विनियोग उत्तम होईल. आम्ही RSS चे नाव सुचविले. खरोखरच RSS चे काम भन्नाट चालले होते. Tourist department Andhra हे मदतकार्यासाठी आलेल्या टीमस्ची मोफत प्रवासाची सोय करायचे. संघातल्या एखाद्याने त्या टीमबद्दल सांगितल्यास त्यांच्या Architects नी एक टिकाऊ 'कुटीर'ही तयार केले होते; पण त्या म्हणाल्या, 'I have heard that it is the extreme rightist fanatic organisation.' मी काहीच बोललो नाही. दोन मिनिटांनी फक्त म्हटलं, 'No real Hindu can be fanatic, not even any christion or A Muslim, actually.' त्या बाई आ वासून पहात बसल्या,

खरेच होते पण. सगळेच काम करत होते. कम्युनिस्ट सोडून कुठल्याही राजकीय पक्षाला इथे काम करायला वेळ नव्हता. त्यांचे केन्द्र का राज्य बेजबाबदार, मिलिट्री येणार का नाही अशा काही किरकोळ गोष्टींवर किंचित मतभेद होते. त्यामुळे राजिनामे वगैरे खेळ चालले होते.

ते सोडले तर हिंदुस्थानचे एक छोटे स्वरूप तिथे होते. भारतीय होते तशा CASA, CARE, OXFAM ही परदेशी मिशन्स सुद्धा काम करत होती. सेकोरूच्या नुसत्या एका रस्त्याच्या टोकापासून दुसरीकडे चालत गेले तर चित्रे सरकायची. RSS चे प्रसन्न श्रीधरजी, CPM चा तो स्मार्ट विद्यार्थी. श्रीनिवासराव नामे नकसलवादी भूमिगत नेत्याने तर गिरीशला हाताला धरून विध्वंस दाखवला होता. आनंदमार्गाचे ऋषिशृंग. जयपूरहून आलेला Micro Eectronics मधल्या quantum field theroy मध्ये phd करणारा सुरेश तिवारी. चंदीगड, दिल्ली, कलकत्ता, बनारस, महाराष्ट्रातल्या तर कित्येक ठिकाणांहून. रूरकेला, खेत्रराजपूर, मद्रास. अख्ख्या भारताची नजर आणि कार्यशक्ती इथे लागली होती. कुठून कुठून येऊन राबता आहेत ही माणसे! कशासाठी? काय मिळणार होते त्यांना? कोणी शेख बशीर, कोणी राजरत्नम्, कोणी मुरलीधर, जोसेफ त्यांना आपलासा वाटतो. का? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेची मीमांसा आहे.

कसे खेळकर प्रसन्न आणि कामसू वातावरण होते. सगळेच एकमेकांची चौकशी करणार. आज क्या देखा? क्या काम किया? खाना हुआ? इ इ. आमच्याकडे पोळ्या आहेत म्हटल्यावर एखादा सरदार हौसेने जेवायला यायचा.

पण या सगळ्याला जबरदस्त फटका बसायचा होता.

एक दृश्य हे रस्त्याचे व्यवच्छेदक लक्षण बनून गेलेले होते. वाट पहात नागरिक बसलेले असायचे, लांबून धुरळा उडलेला दिसला की, उभे राहून हात पसरायचे. गाडी तशीच गेली तर खिदळायचे. दगड मारायचे.

मदत करायला आलेला एक गुजराथी शेट म्हटला 'केवढा सुपीक भाग आहे हा; पण लोकं आता भीक मागायला शिकणार. आपणच भीक घ्यायला शिकणार' त्यांना एकदम टवकाच उडाल्यासारखे वाटले; पण खरे होते. भिकेची नशाही और. काम न करता पैसा मिळाला तर कुणाला नको असतो? मग कधी दुष्काळ म्हणून, वादळ म्हणून. तर कधी PL 480 च्या नावाखाली 'मायबाप पदरात काही तरी घाला हो!' १९७७ मध्ये गोऱ्या कातडीपुढे दीनवाणे हात जोडणारे खेडूत हे याचे केवळ एक प्रतीक.

चीनमध्ये प्रचंड भूकंप झाला होता. लाखोंचा प्रश्न आला होता. तरीही चीनने बाहेरची कुठलीही कवडीची मदत नाकारली होती. राष्ट्रीय अस्मितेला असे काही तरी जबरदस्त आव्हान मिळाल्याशिवाय ती उसळून उठत नाही. युरेनियम मिळणारच नाही म्हटले की आपोआप इथेच युरेनियमवरच्या प्रक्रियेवर काम सुरू होतेच. काश्मीर करारावर सही करा नाही तर अन्नधान्य पुरवत नाही असा परदेशी दबाव आला की, 'नका देऊ. भारत अन्नधान्याच्या बाबतीत दोन वर्षांच्या आत स्वयंपूर्ण करून दाखवू.' ही जिगर येते. कारण तो जीवनमरणाचा प्रश्न बनतो आणि जीवनमरणाचा प्रश्न आला तर भारतीय ऐक्य अद्वितीय असते असा इतिहास आहे एकदा मान वाकवणारच नाही म्हटल्यावर ती मोडणारही नाही याची काळजी घ्यायलाच लागते.

¤

येणाऱ्या मदतींचा जनतेने सदुपयोग करायला सुरुवात केली होती. जास्तीत जास्त माल मिळवून साठवून ठेवण्याचे प्रकार होत होते. वादळामुळे कित्येक कुटुंबे श्रीमंत झाली होती. वाटलेली ब्लँकेटस् दोन दिवसांत बाजारात विकायला आली होती.

कित्येक जण काम करायलाच तयार नव्हते. पडलेले घर बांधायचेच नाही. का? तर घर बांधले तर सरकारी मदत मिळायची नाही म्हणून. नागरी जीवन सुरळीत सुरू झालेले ओळखायच्या दोन खुणा. एक म्हणजे शाळा सुरू होणे.

आणि दुसरे दारूचे अड्डे सुरू होणे. पंचायत किंवा पालिका आणि दारूअड्डे या अख्ख्या भारतातल्या खेड्यांच्या, शहरांच्या ओळखीच्या खुणा. तर असे दारूचे अड्डे सुरू झाले. आलेल्या मदतीचा पैसा करायचा आणि नवटाक मारायची हा कित्येकांचा बिझिनेस बनला होता. शेतात अजून पाणी असल्यामुळे काही कामच नव्हते. म्हणजे तर काय, आधीच फाल्गुनमास.

काही दिवटे घर दाखवायचे 'हे आमचे घर. बांधून द्या.' आणि स्वत: बेपत्ता व्हायचे.

एक दिवस कार्यालयात दोन गृहस्थ येऊन सांगायला लागले 'तिकडे कुठे तरी दोन प्रेते पडली आहेत. आमच्या बरोबर चला.' आम्ही विचारले, 'बाबांनो, तुम्ही का नाही विल्हेवाट लावत त्यांची' तर 'साब हम कैसे उसको हाथ लगा देंगे वो हरिजन है!'

यावर काय प्रतिक्रिया देणार! आपल्या घराशेजारी पडलेल्या, कुजलेल्या, वास मारणाऱ्या प्रेतालाही काही जण हात लावायला तयार होत नव्हते. गाईगुरांची कातडी काढायला मांगाला निरोप पाठवावा तसा आम्हाला बुलावा यायचा.

एक घटना कानावर आली. स्वतंत्रपुरम् खेड्यातली. नाव काय छान आहे! स्वतंत्रपुरम्. वादळाच्या दिवशी सुरक्षितता म्हणून सर्वांनी मंदिरात आश्रय घेतला होता. हरिजन सोडून लांबून राक्षसी लाट येताना दिसल्यावर मात्र ही पंधरा हरिजन कुटुंबे मंदिराच्या दारावर धडका मारू लागली. आक्रोश करू लागली. लाटेच्या आवाजात हा आक्रोश सवर्णांच्या कानांना कळला नसावा. लाट आली आणि हा पंचाहत्तर हरिजनांचा निर्विकार घास घेऊन पुढे सरकली!

मुरहरी राव एक दिवस आला. मोहनला म्हणाला, 'साब, मेरे साथ आओ. वहाँ कुछ मदत नहीं मिली' 'कहाँ?' आता या प्रकारांची सवय झाली होती. 'वो ब्लॉक नं. १७ और १९ में'

जाऊन पाहिले तर ब्लॉक नं. १७ आणि १९ म्हणजे हरिजनवाडे 'हरिजनवाडा' हा शब्द तिथे नाहीच. तिथे पुन्हा धेडवाडा, महारवाडा, कोडुरूच्या अगदी जवळ असून इथे काहीच मदत मिळालेली नव्हती.

मग असे धक्कादायक कळले की कुठेच हरिजनांना मदत मिळत नाहीये. मिळत नाहीये किंवा मिळू दिली जात नाहीये. गावात कपड्यांचा ट्रक आला आला की कपडे तिथेच संपायचे. मग ट्रक गावाबाहेरच्या हरिजन कसला जातोय!

आणि रस्त्यांच्या कडेला उभे राहून हात पसरणारे ते बहुतेक सगळे हरिजन असतात.

¤

आता सरकारी मदतही जोरात सुरू झाली होती. रोजचे रेशन, झोपडीचे बांधायचे सामान, ब्लँकेटस्, स्त्री-पुरुषांच्या कपड्यांची पॅकेट्स् असा संसार आणि वर सव्वाशे रुपये कुटुंबाला अशी भरघोस मदत सगळ्यांना बिनचुक पोचत होती.

म्हणून आम्ही ठरवलं की आता पूर्वीच्या गावातलं काम बंद करून फक्त काही निवडक हरिजनवाड्यातच काम करायचं. तसे तीन हरिजनवाडे निवडले. कोडुरु, इस्माईल बेग पेट आणि लिंगारेड्डीवालेम. तिथे कामाला जायला सुरुवात केली.

हा मुरहरी राव इस्माईल बेगपेटमधला. चांगलं मुंबईचं हिंदी बोलत होता. म्हणून विचारलं तर कळलं की तो अंबरनाथच्या फॅक्टरीत काम करत होता. वरळीच्या झोपडपट्टीत रहायचा. वर्षातून कधी तरी इकडे यायचा.

तोच काय, तिथल्या खूप खेड्यांमधून खूप जण मुंबईला पोट भरायला आलेले आहेत. एकदम एक समस्या डोळ्यांसमोर उभी राहिली. इथून जाणारे मुंबईत झोपडपट्ट्यात जीवन कंठणार आणि खेडेगाव हे 'वृद्धाश्रम' बनून रहाणार. महिन्याच्या महिन्याला फक्त

## 'साब, हम कैसे उसको हाथ लगा देंगे? वो हरिजन है!'

र. पैसे येणापोरगा रहातो कुठे, करतो काय – शून्य. एका म्हातारीची तर चार पोरं मुंबईला गेली होती म्हणे; पण त्यांचा पत्ताच नाही, पत्र नाही पैसे नाहीत !

हे मुंबईचे कामगार सोडून इथे फक्त दोनच वर्ग शेतमालक – शेतमजूर. कोयता कोणच्याही हातात दिसतोच. सुपीक जमीन आहे. मजुरीही पाच रु. रोज स्त्रीपुरुषांना समान मिळते. अर्थात या हरिजनवाड्यातले सगळे शेतमजूर.

पण हरिजनवाडे आणि खेडी, त्यातले लोक यांच्यात काहीही फरक दिसत नव्हता. फरक एकच हरिजनवाड्यातली सगळी पडलेली घरं पुन्हा बांधलेली होती. बहुधा आपल्याला बाहेरून कुठलीही मदत येणार नाही हे त्यांना माहीत असावं. त्यामुळे 'घर बांधले तर सरकारी मदत मिळणार नाही' एवढा सुज्ञ विचार ते करू शकत नव्हते. फार तर एखाद्या वृद्धाचं किंवा स्त्रीचं घर बांधलेलं नव्हतं. हे एक निरीक्षण आणि दुसरं म्हणजे मुसलमान सगळे हरिजनवाड्यात रहात होते.

काय कान काय करायचं अशी चौकशी करण्यासाठी आम्ही सगळ्यांना एकत्र केलं तेव्हा त्या अशिक्षित बांधवांनी एक धक्काच दिला. आम्हाला पडकी शाळा आणि मंदिर दाखवलं आणि सांगितलं, की बस्स आम्हाला एवढं दुरुस्त करून द्या. बाकी काही नको ! आमची मुलं घरी बसून आहेत हे पाहवत नाही !

¤

कामाला सुरुवात केली. एक दिवस एक गंमत झाली.

पुण्याहून कपडे घेऊन मागून आलेल्या ट्रकबरोबर काही पालकांनी खाऊ पाठवला होता. लाडू, चॉकलेट वगैरे. आमच्यापैकी कोणाचा तरी दोन दिवसांनी वाढदिवस होता म्हणून. ती चॉकलेट कार्यालयातल्या कपाटात ठेवली होती. संध्याकाळी सगळे आले तर काय ! चॉकलेटचा पुडा फुटलेला आणि निम्मी चॉकलेट गायब. घटना तशी साधीच होती; पण मनाला लागण्यासारखी. कारण सगळे एकत्र रहात असताना हे होऊ नये.

दुसऱ्या दिवशी कोणीही जेवणार नाही असं ठरविलं. सकाळपासून पाण्याचा थेंब पोटात नाही. अन्नाचा कण नाही, तरीही सगळ्यांनी काम करायचं. चुकारपणा न करता. बघूच या एकदा रिकाम्या पोटी काम करणं ही काय चीज असते ते. दुपारी फक्त बोटाच्या आकाराची दहा केळं प्रत्येकाना खायची. आज रात्री ८ नंतर एकदम उद्या रात्री ८ ला जेवण. एकदा ठरलं म्हटल्यावर तडजोड नाही.

त्या दिवशी काम करताना कित्येकांनी चहा, कॉफी देऊ केली; पण घेता आली नाही. जो तो धडपडत होता. आपल्या पोटात काही जाऊ नये. यासाठी – केडुरूच्या हरिजनवाड्यातला एक जण तर तिथे काम करणाऱ्यांना दुःखानं म्हटला, की आम्ही अस्पृश्य म्हणून तुम्ही आमच्याकडे काही घेत नाही. म्हणजे हे आणखीनच वाईट. प्रशांत आणि दीपकला तर एकानं फरफटत ओढून घरात नेऊन तोंडात घास भरविले. हे ते संध्याकाळी दुःखाने सांगत होते.

लिंगारेड्डी पालेममध्ये असच होत होतं; पण तिथे विवेकने 'आम्ही उद्या संध्याकाळी तुमच्याबरोबर जेवायला, झोपायला येऊ' असं आश्वासन दिलं. त्याप्रमाणेते दुसऱ्या दिवशी गेले. त्यांच्याबरोबर त्यांचं जेवण जेवले मग रात्री उशीरापर्यंत गाणी, पद्य म्हणत बसले. ते तेलगूत हे मराठीत. कुणाचं कुणाला समजत नसणार; पण गोडीच विलक्षण !

जसं भांडायचेच असं ठरविल्यावर काही कारण लागतंच असं नाही तसंच 'आम्ही एक आहोत' असं म्हणायलाही काही ऐहिक कारणं असावीच लागतात असं नाही.

इस्माईलबेग पेटच्या मंदिरात रात्री आम्हीही साग्रसंगीत भजन केलं चुरमुरे वाटून केलं. नारळाचा प्रसाद वाटून. वस्तीतले लोकही उत्साहाने, कौतुकाने भजनाला आली होती त्यांनीही धुनी म्हटल्या त्यातली एक धून होती, 'पांडुरंगा रंगा पंढरीच्या नाथा' काय ऊर भरून आलं होतं त्या वेळेला ! मग त्यांनी गोलातला एक नाचही करून दाखविला. गात...गोलात फिरत गाता गाता एकदम त्यांच्या तोंडातले हे शब्द स्पष्ट ऐकू आले आम्हाला –'कृष्णानं मुरली वाजिविली.' आश्चर्यचकित झालो.

¤

वादळ होऊन चार आठवडे उलटून गेले होते. हळूहळू आन्ध्र उभा राहू लागला. तुटलेल्या तारा जुळल्या. वाकलेले खांब उभे राहिले. रेल्वेवाहतूक सुरू झाली. काळ हे मोठं औषध असतं. त्या औषधानं रामबाण परिणाम घडवून आणायला सुरुवात केलीच होती. पुढे पुन्हा जीवन वाढून ठेवलेलं आहे ना. ते जगायलाच पाहिजे. असं यात रमून कसं चालेल ?

आता आम्ही कामाला गेलो तर वस्ती दुपारी शांत असायची. सगळेजण शेतावर कामाला. जे काय आहे ते पीक काढायला हवे ! घरी बसून काय करणार ? जवळच्या जिवलगांचे निधन झाल्यानंतर दोन दिवस एखाद्याने दुःखाने न जेवावे, मग त्याला आपल्याला पोट आहे याची जाणीव व्हावी आणि डोळे पुसत त्याने पान घ्यावे तसे वातावरण होते.

तेव्हा लक्षात आले की, आता आपल्याला जायला हवे. एकदम काळजात काही तरी हलले. समजले की, या माणसांशी, या मातीशी आतून आता कुठे तरी जुळलेला आहे मी. निरोप घ्यायला म्हणून लोकांकडे गेलो. 'कलसे हम नहीं आयेंगे !' प्रतिक्रियाही ओल्या. एका म्हातारीने विडी 'ऑफर केली. 'बेटा, इसके सिवा कुछ नहीं!' एका वृद्धेने गालावरून कडाकडा बोटे मोडली आणि डोळे पुसले. एवढा विध्वंस झालेला असताना आम्ही जेवताना मात्र 'भगवान तेरा भला करे !' ही दुवा त्याच्या मुखी. काही जणांनी भाबडेपणाने विचारले, 'फिर कब आओगे ?' आम्हीही हसून सांगितले, 'आप जब बुलाएंगे !' फक्त या वेळेला पाठविला तसा निरोप पाठवू नका हो ! मुराहरी रावचा पत्ता अजून आहे माझ्याजवळ.

शेवटचा दिवस. कोडुरु समुद्रापासून ८।१० मैल आहे. चालत, पाणी तुडवत समुद्रावर गेलो. शांत होता. किंबहुना प्रसन्न होता. आमच्यापैकी एकजण म्हणाला, 'बघ, आता कसा शांत बसलाय. पुन्हा करणार नाही म्हणतोय.'

'हजार जिव्हा तुझ्या गर्जू दे' असे उद्दामपणे म्हणणे ही अमृतपुत्रांची हिंमत; पण त्याची एक जिव्हा नुसती हलली तर लाखो हातांना ती थोपवता थोपवता नाकी नऊ आणले. समुद्र माणसाला अबोल बनवितो. निदान माझ्यासारख्याला अबोल बनविण्याचे, विराट रूपदर्शन दाखविणाऱ्या सागराचे सामर्थ्य अफाट आहे.

लांबून समुद्र दिसल्यावर पळत सुटलो...पूर्वेकडे सूर्य वर आलेला...समुद्रात चंदेरी पाणी उकळतेय...समुद्रात पाऊल टाकले. चार पावले आत गेलो एक लाट आली . मी पीछे मुड केले ..

तेव्हा अख्खा हिंदुस्थान सामोरा आला. हा असा डाव्या हाताला खाली गेलाय. तिथल्या टोकाच्या एका खडकावर भर समुद्रात एक पहाड आहे आणि उजव्या हाताला वर गेलाय. कसा पसरला आहे हा खंडप्राय...भूतकाळ किती हजार वर्षांचा ? आणि भविष्यकाळ !

केवढे सामर्थ्य आहे ही आन्ध्रची भूमी एवढी सुपीक आहे की, नुसता आन्ध्र भारताला पुरेल एवढा तांदूळ पिकवू शकेल. पंजाब गहू, उत्तरप्रदेश साखर आणि महाराष्ट्र ?

महाराष्ट्र माणसे पिकवेल ! माणसे पिकली नाहीत, बाकीचे सगळे वाया जाते आणि माणसे बहरली तर खडकावरही नंदनवन होते असा इतिहास आहे. मग महाराष्ट्रच का ? सगळयांनाच हे काम करायला लागेल.

एक लाट पाठीवर फुटली आणि जिथे समुद्राचे पाणी भरतभूमीला भिडत होते तिथून दोन फुटांवर एका बालकाचे प्रेत पडले होते, हे दिसले.

मी भानावर आलो !

□

आता परतायचे ! पंधरा दिवसांची मलमपट्टी. एकेक आठवणी झरझर पळायला लागल्या. गाडी हलली. ती सपाट भूमी, ते नाले, नारळाची झाडे मागे पळायला लागली. आता बाकी राहिला फक्त हिशोब ..काय गेले ! काय राहिले ? आपण काय केले ?

गाडीने पळता पळता एक शेत दाखविले. केळीचे वन होते. लांबवर पसरलेले. वादळाने झोडपल्यामुळे सगळे खुंट अर्ध्यातून तुटून पडले होते पाने पाण्यात भिजून पिवळी पडली होती. खुंटही पिवळे पडले होते. काळीशार माती वाळलेली होती आणि सगळ्या केळीच्या खुंटांमधून एक नवीन हिरवा अंकुर वर डोकावत होता !

आम्ही तृप्त होऊन परतलो

□

आता बरेच दिवस झाले !

कृष्णेमधून एका पावसाळयाचे पाणी समुद्राला मिळाले आहे. आता तिथे काय स्थिती असेल ?

अशा वेळेला ते वाक्य पुन्हा पुन्हा आठवते. They have nothing to louse bnt poverty, त्यांच्याजवळ गरिबीशिवाय गमावण्यासारखे काही नाही. आपण करतो आहोत ही केवळ क्षणैक मलमपट्टी आहे हे त्या वेळेलाही जाणवतच होते.

कोणी तरी त्या वेळेलाच म्हटले होते, 'आत्ता खूप मदत येतीय् पण तीन महिन्यांनी यांची स्थिती हलाखीची होणार आहे. कारण तेव्हा मदत करणारे कोणी नसेल आणि हे पीक तर हातचे गेले आहे. पुढे दोन मोसमही फार तर दोन आणे–चार आणे पीक निघेल !'

आमच्या तुकडीनंतर भाई फडकेच्या नेतृत्वाखाली आणखी एक तुकडी जाऊन आली.

पुढे काय ?

कोडुरु सोडून गाडी हलली तेव्हा डोक्यात विचार आला होता की, आता पुन्हा केव्हा येणार ? का आम्हाला, जगाला या भागाची आठवण पुन्हा १४४ वर्षांनी होणार ? नाही. इथे पुन्हा जायचेय्. जावे लागणार आहे. आता गेलो ते पंधरा दिवसात परत येण्यासाठी. तिथल्या मातीवरचे, खाऱ्या पाण्याचे सावट दूर करण्यासाठी. आता जायचे तर मातीच बदलण्यासाठी लोक उंचावण्यासाठी !

मी हे स्वप्नरंजन करतोय, का ? मलाही कळत नाहीये; पण काय हरकत आहे ? मी मोठा होईन, खूप पैसा मिळवीन, सुखासीन राहीन या स्वप्नांपेक्षा हे माझे स्वप्नही पदसिद्ध उंच आहे.

आणि स्वप्न कशाला म्हणू ! आन्ध्र, त्यातून जोपासलेली जाणीव माझ्या अंगावर अजून आहे. त्या वेळेला उन्हाने भाजलेली कातडी, रापलेला चेहरा हा आता माझाच रंग बनून गेला आहे.

म्हणून म्हटलं ..

'आमच्या स्वप्नांना आमच्या गगनभेदी कर्तृत्वाचा अर्थ' येवो !

नाही तर सगळे शांत आहे.

कृष्णा वहातीय्. समुद्राच्या लाटा किनाऱ्याला अविरत धडकता आहेत पूर आले आहेत. खुनाखुनी जोषात आहे. राजकीय रंगमंचावर होळी, रंगपंचमी, धुलवड एका वेळेला चालू आहे. आमचे पाणी-तंटे–सीमातंटे ..

आणि तो मुरहरी राव वरळीच्या झोपडपट्टीत आहे. राजरत्नम् पेद्दागोडमोटूमधे आहे.

□

इथे उपासना चालू आहे दिवे मंद तेवता आहेत... शांत आहे. प्रसन्न आहे. समोर हिंदुस्थानची चित्रमूर्ती आहे आणि 'ॐ यज्ञेन यज्ञम् अयजत देवाः' त्या परमपुरुषाने स्वतःचीच आहुती स्वतः देऊन हे विश्व निर्माण केले...'

स्वतःचीच आहुती स्वतः देऊन !

□

---

२ डिसेंबर अंकात विनय हर्डीकर यांचा चिकमगळूर प्रवासावरील पहिला लेख प्रसिद्ध झाला. त्यानंतर क्रमशः २।३ लेख पुढील अंकातून देण्याची कल्पना होती; पण अचानक उद्भवलेल्या अडचणीमुळे लेख प्रसिद्ध होऊ शकले नाहीत. आता विषयही मागे पडला. म्हणून तूर्त लेखमालेचा विचार स्थगित. वरील 'आन्ध्रानुभव'प्रमाणे पुन्हा केव्हा तरी हा सुटलेला विषय ताजेपणाने सादर करण्याची कल्पना सोडून दिलेली नाही.

—संपादक-लेखक

विदेशी चित्रपट

# एका फेरीवाल्याची शोकांतिका

अशोक प्रभाकर डांगे

एरवी तोदेखील चार-चौघांसारखाच वाढला असता, शरीराबरोबरच मनानंही विकसित होत गेला असता. बुद्धीनं आक्रमक बनला असता आणि त्याचबरोबर भावनांची तरलताही जपत राहिला असता. परिणयानं पुलकित होताहोताच, सुख-स्वप्नांच्या नगरीचा नागरिक होऊन गेला असता. कोणत्याही युरोपीय तरुणाइतकाच उत्साहानं ओथंबून गेला असता. स्वतःला शोधत असतानाच जगालाही शोधीत राहिला असता. नव्याला निर्भयतेनं सामोरा गेला असता. व्यक्तिमत्त्वाचा विकास साधता साधताच यशाच्या कनाती मिरवत राहिला असता. व्यवहारी जगाच्या धकाधकीत चार समर्थ पावलं आपली आण चालला असता, अपयशाच्या उन्हातून वाटचाल करत करत यशाच्या गर्दगार सावलीला विसावलाही असता.

पण हान्स एपच्या हातनं ह्यातलं काहीच झालं नाही. तसा तो सैन्यात शिरून परकीय भूमीवर लढून आला असला तरी त्याच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचं रोपटंच विकसलं नाही. गणिती मितीनं त्याचं वय वाढलं आणि निसर्गनियमानं त्याचं शरीर वाढलं. बस्स, एवढंच. बाकी त्याचं सारंच स्वत्व त्याच्या आग्रही नि करारी आईनं फस्त करून टाकलं. स्वतःच्या व्यक्तित्वाच्या ओझ्याखाली त्याला पुरतं चिरडून टाकलं. हॉन्स एप वाढला पण बुद्धीनं मंद झाला आणि मनानं कुढा बनला. 'त्याला काही म्हणून जमायचं नाही' हा त्याच्या बाबतीत परवलीचा शब्द मंत्र ठरला आणि त्यातच तो संपला स्वतच्याच स्वायत्ततेला पारखा झाला! तशी त्याच्या पुढंही चार-चौघांसारखी स्वप्नं होती. त्याला इंजिनिअर व्हायचं होतं; पण सारा मामलाच फसला. त्याच्या भवितव्याचे लगाम हाती ठेवणाऱ्या त्याच्या वयस्क आईनं, नाकर्तेपणाचं जू त्याच्या मनावरून कधी कोणाला काढूच दिलं नाही. म्हणून 'झेपायचं नाही' ह्या नावाखाली तो साध्या शिक्षणालाही पारखा झाला. आपल्याच आईच्या मानसिक गुलामगिरीत वावरू लागला. रांगड्या, बुजऱ्या, अनपढ तरुणाचं भवितव्यच त्याच्या वाटचाला आलं आणि मग हा खुरटलेला जर्मन तरुण म्युनिच शहराच्या गल्ल्या-बोळांत फळं विकायचा धंदा करू लागला.

इंजिनिअर होऊ इच्छिणारा एक तरुण अखेर फळविक्या बनला. हान्स एप दारोदार हातगाडी घेऊन वणवण फिरू लागला. घसा खरवडून, आरडून-ओरडून कधी पीच, कधी पिअर्स, कधी टमाटे विकू लागला. त्याच्या आईला त्यात काहीच वावगं वाटत नव्हतं. घरात सारेच तुच्छतेनं पहाणारे. ह्या साऱ्या पार्श्वभूमीला हे साजेसंच ठरणार होते; पण म्युनिकचा फळविक्या झाला म्हणून काय झालं? हान्स एप हाही माणूस नावाचा प्राणीच होता आणि नुस्ता माणूसच नव्हता तर चांगला तरणाताठाही होता. म्हणून तर हंगामाप्रमाणे बदलती फळं विकता-विकताच हान्स कुणा एकीच्या प्रेमातही पडला; पण इथंही गणित चुकलं. दैवानं पुन्हा एकदा झुकांडी दिली. 'एका फळविक्याशी विवाह लावायला' त्याच्या त्या खानदानी प्रेयसीनं आपल्या बापाचं खानदान पुढं करून साफ साफ नकार दिला!

मोरोक्कोत अरबांच्या रूपानं चालून आलेल्या मृत्यूपासून दैवानंच निसटलेला, त्यानंतर आईच्या व्यक्तित्वाच्या सावलीनं सुकून गेलेला, मनानं खंगलेला आणि बुद्धीनं बुजलेला हान्स एप इथे मात्र पुरता कोलमडून पडला. अपेक्षेबाहेरच्या प्रेमभंगानं तो समूळ हादरला. स्वतःचा होता नव्हता तोही तोल, गमावून बसला. ह्याच उद्वेगात त्यानं एका सरळ-साध्या तरुणीशी—इमगार्डशी विवाह लावून टाकला आणि संसाराची आखीव वाट चार-चौघांसारखाच चालू लागला.

हान्सचं हे 'मार्गाला लागणं' लौकिकार्थापुरतंच मर्यादित राहिलं. एका उध्वस्त, अपयशी नायकाची भूमिकाच तो बजावत होता. स्वतःच्या मर्यादाबरोबरच जगाच्या कृतघ्नतेवरही तो चिडून होता. एका छानशा मुलीचा बाप होऊनदेखील तो असा-तसाच वागत होता. प्रसंगी बेजबाबदार, प्रसंगी बेतालही होत होता. भल्या सकाळी गाडीवर फळं लादून विक्रीला बाहेर पडत असला तरी चौका-चौकात, सणक येताच सरळ गाडी टाकून जवळचा बार गाठत होता आणि घाई-गर्दीनं दारूचे पेग वर पेग फस्त करत होता. पत्नी इमगार्द धोरणी बाई. सावलीसारखी मागे राहून, त्याच्या अनुपस्थितीत नेटानं फळविक्री चालवत होती.

उशिरापर्यंत जेवणाच्या टेबलावर त्याच्यासाठी खोळंबत होती आणि रात्रीपर्यंतही तो घराकडे न फिरकल्यास फोनाफोनी करून त्याला शोधायसाठी धडपडत होती; पण हा मात्र खुशाल बारमध्ये अचकटपणे पीत, मित्रांबरोबर उभ्या-आडव्या गोष्टी बरळत रात्र जागवीत पडलेला, त्याची आणि त्याचबरोबर तिचीदेखील!

त्या दिवशीही बरोबर हाच तमाशा झाला. बिचारी इमगार्द त्याचा शोध घेत बारपर्यंत येऊन पोहोचते तर हा पठ्ठ्या 'पकडलेल्या एका वेश्येच्या मोहापायी आपण पोलिसाची नोकरी कशी गमावली' तेच दोस्तांना पुन्हा पुन्हा रंगवून सांगत बसलेला! 'घरी चल!' ही तिची विनवणी. 'माझ्या मनाला वाटेल तेव्हाच घरी येईन. क्षणभरही आधी येणार नाही!' ही हान्सची उत्तरादाखल दटावणी. ती अधिकच ताटकळलीय. हे पाहिल्यावर तर हा बेहोष होऊन सरळ तिच्या रोखानं खुर्चीच भिरकावून देतो. इमगार्द तिथनं काढता पाय घेते आणि बारवाली बाई 'मोडलेल्या खुर्चीची किंमत भरून घेईन' म्हणून हान्सलाही चांगलाच दम भरते. इमगार्द रडतरडतच घरी परतते. स्वतःच्याच नशिबाला बोल लावते आणि तेवढ्यात रस्त्यात एक 'खुशाल' माणूस, ह्या एकाकी स्त्रीला सहजपणे विचारतो,

, तुझा एका रात्रीचा दर काय ?' इमगार्दच्या दुःखी मनाला ह्या डागण्या मात्र सोसवणाऱ्या नसतात. इमगार्दच्या पाठोपाठच हान्स घरी येऊन पोहोचतो. तो पुरता धुंदीत असतो. त्यात चिडली-दुखावलेली ती स्त्री त्याला 'घाणेरडा डुक्कर !' म्हणते तेव्हा तर त्याच्या भावनांचा पुरताच विस्फोट होतो. तो पिसाटपणे पत्नीला बडवतो. बारकी पोरगी रिमेटी आपला दुबळा विरोध करून पहाते; पण निष्फळ ! हान्स इमगार्दला यथेच्छ बुकलून काढतो आणि मारून मारून थकल्यावर डुकरासारखाच झोपूनही जातो !

हान्सच्या पिसाटपणानं पीडलेली, त्याच्या क्रूरतेला कावलेली, त्याच्या रासवटपणाला भेदरलेली इमगार्द तो गाढ झोपेत असतानाच, घराबाहेर पडते. आपल्याबरोबर मुलीलाही घेऊन जाते. हा सकाळी उठतो. ताळ्यावर येऊन शोधशोध शोधतो आणि तिची निरोपाची चिठ्ठी वाचून हताश होतो ! आता त्याचं अचानक इमगार्दबद्दलचं प्रेम दाटून येतं. तिची आवश्यकता वाटू लागते. आपल्या फळवाहक टेम्पोतून तो तसाच पिसाटपणे तिचा शोध घ्यायला घराबाहेर पडतो.

दुखावलेली इमगार्द सरळ हान्सच्या आईचं घर गाठते. त्याच्या क्रूर वर्तनाची तिला जाणीव करून देते. तर ती 'भली' स्त्री हान्सला सोडून इमगार्दलाच नावं ठेवायला सुरुवात करते; पण हान्सची पाठची बहीण ॲन चांगलीच खमकी निघते. ती सरळ सरळ आपल्या आईलाच सुनावते. 'तुम्हीच आजवर त्याची उपेक्षा करत आलात म्हणूनच तो त्या अवस्थेला घेऊन पोहोचलाय ! ' ॲनचे शब्द चांगलेच जळजळीत असतात. हान्सच्या साऱ्या कुटुंबियांनाच ते परिस्थितीची परखडपणे जाणीव करून देतात; पण त्यांना तेही मानवण्यासारखं नसतं. इमगार्दच्या शोधात बाहेर पडलेला हान्स आता तिथेच येऊन पोहोचतो. इमगार्द घाबरते. 'तो माझा जीव घेईल' म्हणून किंचाळू लागते. बेहोश हान्स परत एकदा तिच्यावर हल्ला करतोच आणि अखेरचा उपाय म्हणून इमगार्द वकिलाला फोन फिरवते; घटस्फोटाची नोटीस द्यायची तयारी करते. हा धक्का मात्र हान्सच्या दृष्टीनं जबरी ठरतो. तो हार्ट अटॅकनं जागच्या जागी कोलमडतो. सारेच स्तब्ध होतात, थरकापतात. ॲन फोन फिरवून गाडी बोलावून घेते. बेशुद्ध हान्सला हॉस्पिटलमध्ये दाखल केलं जातं.

आता परिस्थितीच पालटते. एकूण संदर्भांची उलथापालथ होते. आपल्या क्रूर नवऱ्याची इमगार्दला दया येते. ती हान्सला हॉस्पिटलमध्ये पहायला जाते. हान्स बेहोशीतच असतो. त्याला भेटायला, बोलायला मनाई असते. इमगार्द कशीबशी भेट मिळवते. इथे पत्नीच्या नात्याला इमगार्द चांगलीच जागते. हान्सला धीर देते, 'हेही दिवस जातील. तू ह्यातनं उठशील, पुन्हा आपल्या धंद्याला लागशील,' अशा शब्दांनी समजावत रहाते. पश्चात्तापानं पोळणारा हान्स तिला एकच प्रश्न विचारतो, 'माझ्यासारखा बिनशिकलेला काय कामाचा ?'

हॉस्पिटलच्या लाउंजमध्ये बसलेली रिमेटी एका नर्सला कुतूहलानं विचारते,

'माझे वडील लौकर मरणार आहेत का ?' आणि ती नर्सही अजाणतेपणी उद्गारते,

'अग, प्रत्येकालाच कधी ना कधी मरण हे येतंच !'

रिमेटीच्या बालमनावर हे शब्द जबरदस्त आघात करून जातात. ती हॉस्पिटलमधून पळते आणि आँटी ॲनला गाठते आणि तोच तो प्रश्न तिलाही विचारते. सूज्ञ ॲन तिची समजूत काढते.

'हान्सला जगायचं असेल तर तो निश्चित जगेल !'

हान्सच्या आजारपणातच एक विलक्षण घटना घडून जाते. ॲटील नावाचा एक रांगडा पण विवाहित पुरुष इमगार्दच्या आयुष्यात कसा कोण जाणे येऊन पोहोचतो. हान्सला कंटाळून गेलेल्या इमगार्दच्या शरीरालाही कसला तरी आधार हवासा होतो. आँटीलचा एक सहवास ती उपभोगते; पण इथेही तिचं दैव आडवं येतं. रिमेटी एका विचित्र अवस्थेत त्यांना पाहाते आणि उध्वस्त इमगार्द त्यामागोमाग ढसढसा रडते. रिमेटीचा मघाचा प्रश्न आपल्याला झोंबत जातो, तशीच त्या वेळची विलक्षण नजरही बरंच काही सांगून जाते.

पूर्णतः दुर्बल झालेल्या हान्सला हॉस्पिटलमधून डिसचार्ज मिळतो; पण त्याबरोबरच डॉक्टर इमगार्दला बजावतात, 'त्यानं कष्टाची कामं करता कामा नयेत; अवजड ओझी उचलता कामा नयेत आणि दारू म्हणजे त्याचा मृत्यूच ठरणार आहे ! ' ही अखेरची अट जबरदस्त असते. हान्सच्या दृष्टीनं तर फारच अडचणीची !

फेरीवाल्याचा व्यवसाय हान्सच्या दृष्टीनं आता उपयोगाचा नसतो. इमगार्द शहाणी, विचारी. ती त्यावर तोडगा काढते. आपल्या हातगाडीचा एक कायमचा स्टॉल उभारते. तिथे स्वतः विक्रीला बसते आणि एक जुनी हातगाडी विकत घेऊन फळविक्रीचं काम एका पगारी माणसावर सोपवायचं ठरवते. हा व्यवहार फायद्याचा असतो. हान्सचा संबंध फळ-खरेदी आणि देखरेखीपुरताच येणार असतो. हान्सचं कामही सोपं होऊन जातं. हान्स नव्या उत्साहानं कामाला लागतो. जाहीरात देतो. मुलाखती घेतो आणि अखेर नवा नोकर नेमतो. ह्या नोकराला पाहताच इमगार्द चमकते. तिचा एका रात्रीचा प्रियकर आँटीललाच हान्सनं निवडलेलं असते. इमगार्द दुबळासा, लटका विरोध करते; पण हान्स आपला निर्णय बदलायला तयार नसतो. आँटील प्रामाणिक निघतो. तो चोख विक्री करतो आणि हान्सचा विश्वास सहज संपादन करतो; पण एकदा हान्स मार्केटात टोमॅटो खरीदायला गेलेला. गाडीत इमगार्द आणि आँटील एकटेच उरतात. आँटील उतावळेपणी ही संधी साधतो. तिला मिठीत घेऊ पहातो. त्याच्यात पूर्वीच मन गुंतलेल्या इमगार्दचा त्याला विरोध नसतो. ती एवढंच म्हणते, 'थांब. आत्ता नको. तुला वचन देते. मी नक्कीच तुझ्याजवळ येईन. थोडी वाट पहा !' तेवढ्यात हान्स समोरून येताना दिसतो. आँटीलचं ते प्रेम अपुरंच राहून जातं !

इमगार्दसाठी भाव वाढवून फळ विकायचं आणि फायद्यातला एक वाटा हान्सच्या नकळत तिला द्यायचा आँटील कबूल करतो; पण आँटीलवर पाळत ठेवणारा हान्स, त्याची लबाडी लगोलग उघडी पाडतो. आँटील खवळतो. दोघांचा चांगलाच खटका उडतो. परिणामी आँटील रागानं नोकरी सोडून चालता होतो. जाताना हान्सला बजावतो, 'ह्या बाईपायी मी असा वागलो !' वर आँटील त्वेषानं इमगार्दला मारायला धावतो. हान्स मध्ये पडतो. आँटीलला घराबाहेर घालवून देतो.

हान्सची फरफट चालूच रहाते. धंद्याचंही नीटसं जमत नसतं. त्याच सुमारास एका हॉटेलात त्याचा जुना दोस्त चार्ल्स वेटर म्हणून त्याला भेटतो. आपल्या युद्धावरच्या ह्या दोस्ताला पाहताच तो आनंदतो. हान्स त्याला घरी आणतो. इमगार्दशी ओळख करून देतो. चार्ल्सनंच मोरोक्कोत अरबांच्या तावडीतून हान्सला जीवे वाचवलेला असतो. हान्स आता चार्ल्सलाच आपल्याकडे नोकरीला ठेवून घेतो आणि इमगार्द विरोध करीत असतानाच त्याला स्वतःकडेच रहायलाही ठेवून घेतो. चार्ल्स नेक निघतो. हान्सचं धंद्यात पुन्हा एकदा बस्तान बसतं.

नव्या वर्षाची पार्टी हान्सच्या आईकडे होते. हान्स, इमगार्द, अॅन, इतर सर्वच हजेरी लावतात. तिथेच पुन्हा एकदा जुन्या भांडणाचा भडका उडतो. नेहमीप्रमाणे आई हान्सला सल्ला देऊ लागते. कमी लेखते. मग सारं वातावरणच गढूळतं. अॅन पुन्हा एकदा साऱ्यांना बजावते, 'तुम्ही हान्सचा तिरस्कार करता!' पण हान्स इथेही आई-पुढे पड खातो. तो अॅनला येवढंच म्हणतो, 'त्यांचं काही चूक नाही!'

ह्या घरगुती भांडणात हान्स उद्विग्न होतो. आपल्या परावलंबित्वाची जाणीव होऊन नव्यानं खचून जातो. उध्वस्त होतो. निराशेनं हान्स घेरला जातो. त्याचा सारा तोल परत बिघडतो. तो वेळी-अवेळी आवडत्या टयून्स ऐकतो. मग मध्येच खंवळून त्याच रेकॉर्डस फोडूनही टाकतो. नेहमीच मूक रहातो. आपल्याच विचारात गढून जातो. चार्ल्स हान्सच्या ह्या अवस्थेतही त्याच्या धंद्याची व मुलीची काळजी वाहतो. आपल्या दुर्बलतेनं ग्रासलेला, आयुष्यात अपयशी ठरलेला हान्स, रस्तो-रस्ती, रानो-माळी, वेळी-अवेळी भटकतो. ह्याच भ्रमिष्ट अवस्थेत एकदा तर तो आपल्या प्रेयसीच्या घरी देखील जातो आणि ती स्वतःच देऊ करत असलेलं तिचं शरीरही विमनस्कपणे नाकारतो.

आपला नाकर्तेपणा हान्सला बोचत असतो. दुसऱ्याच्या आधारानं वाढल्याची खंत जाळीत असते. मन निराशेनं झपाटून जातं आणि अशा भयानक मनःस्थितीत हान्स दारूला पुन्हा एकदा जवळ करतो. बारच्या टेबलावर जुने मित्र जमवतो. चार्ल्सला 'तू खरा मित्र आहेस!' ह्या शब्दात कृतज्ञता जाणवून देतो आणि त्याचा मृत्यूच असणारी दारू पीत रहातो. इमगार्द प्रथम त्याला 'हान्स पिऊ नकोस. तू मरशील!' म्हणून बजावते; पण उध्वस्त विश्वात वावरणाऱ्या हान्सला ह्या अपयशी जगात जगायचंच नसतं. तो पीतच रहातो. आई, बहिणी, मेव्हणा, मुलगी, बायका, प्रेयसी, शाळा, नशीब, परिस्थिती प्रत्येकाच्या नावानं बेभान होऊन एकेक पेग सपवितो आणि मग मरून पडतो. मोरोक्कोत चुकवलेल्या मृत्यला आता स्वतःच्या इच्छेनंच त्यानं कवटाळलेलं असतं.

हान्स एप नावाचा हा जर्मन, चार-चौघां-सारखा वाढला नाही, विकसित झाला नाही, स्वतःच्या पावलांनी चालला नाही. एका दुय्यम भूमिकेतच तो वावरला! आणि स्वत्वाला पारखाही झाला आणि संपलाही! त्याला करायचं होतं खूप काही; पण त्यानं केलं मात्र काहीच नाही. स्वाभाविकच जगाच्या व्यवहारात तो मोठ्या अपयशाचा एक धनी मात्र होऊन बसला! अर्थात अशी आत्माच गमावून बसलेली माणसं आपल्यालाही व्यवहारी जगाच्या नाक्या-नाक्यावर नेहमीच भेटत असतात. ❏

चित्रपट : **दी व्हेजिटेबल पेडलर**
दिग्दर्शक : **फासब्राइण्डर**
देश : **जर्मनी**

---

# आढावा

## पृष्ठ ४ वरून

जनता पक्षाने जिंकली होती; पण या वेळी तेथेही इंदिरा गांधींनी जनता-उमेदवारापेक्षा १९१५ मते अधिक मिळविली. जनता-उमेदवारास तेथे फेब्रुवारी १९७८ पेक्षा फक्त ११९२ मते अधिक मिळाली. तीन निवडणुकांत इंदिरा-काँग्रेस आणि जनता यांच्या मतांत कशी वाढ झाली हे पुढील आकडयांवरून स्पष्ट होईल. त्यातील १९७७ ची मते सबंध काँग्रेसची आहेत. त्या वेळी फूट पडलेली नव्हती.

| वर्ष | इंदिरा-काँग्रेस | जनता |
|---|---|---|
| १९७७ | २०८२३९ | १४३६७१ |
| फेब्रु. १९७८ | २२४२९० | १६४२०४ |
| नोव्हें. १९७८ | २४९३७६ | १७२०४३ |

या आकडयांवरून असे दिसते की, जनता पक्षाच्या मतांत झालेली वाढ इंदिरा-काँग्रेसच्या मतांत झालेल्या वाढीपेक्षा तुलनेने कमी आहे. फेब्रुवारी १९७८ मधील विधानसभा-निवडणुकांशी तुलना करता हे विशेष जाणवते. इंदिरा-काँग्रेसच्या मतांत २५ हजारांची वाढ झाली, तर जनता पक्षाच्या मतात फक्त ८ हजारांची वाढ झाली. इंदिरा गांधींऐवजी दुसरा उमेदवार उभा असता तर मतांत एवढी वाढ झाली असती की नाही, याची शंका आहे. सुरक्षित मतदारसंघात इंदिरा गांधींनी विजय मिळवावा यात अनपेक्षित काही नव्हते.

इंदिरा गांधी विजयी झाल्याने परिस्थितीत काही फरक पडणार नाही, अशी प्रतिक्रिया जनता-नेत्यांनी नंतर व्यक्त केली; पण या निवडणुकीला एवढे महत्त्व नव्हते. तर ती एवढया अटीतटीने कशासाठी लढविली असा प्रश्न मनात येतो. निवडणुकीत आपला पराभव झाल्यानंतर प्रतिपक्षाचा विजय कमी लेखण्याचा हा प्रयत्न काहीसा आत्मबचावाचा आहे. हरीजन, मुस्लिम, मागासजमाती आणि कॉफीमळचातील कामगार यांच्या पाठबळावरच इंदिरा गांधींनी ही निवडणूक मुख्यतः जिंकली. या दुरावलेल्या वर्गाचा पाठिंबा मिळविण्यासाठी जनता पक्षाने त्यांच्यात भरीव कार्य करायला हवे.

जनता पक्षाला प्रभावी पर्याय होण्याचे सामर्थ्य सुवर्णसिंग काँग्रेसमध्ये नाही, धोरणाचा ठामपणाही नाही हे चिकमगळूरने दाखवून दिले. इंदिरा काँग्रेसच्या एकाधिकारशाहीप्रमाणेच जनता पक्षाच्या प्रतिगामी धोरणांना आमचा विरोध आहे; देशात तिसरा लोकशाही पर्याय आमचा पक्षच होऊ शकेल, असा आमचा विश्वास असून त्यासाठी पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व ठेवले आहे, असा स्वर्णसिंग काँग्रेसचा दावा, पण चिकमगळूर निवडणुकीबाबत धोरण ठरविताना या

तत्त्वाचा सोइस्कर विसर त्या पक्षाच्या नेत्यांना पडला. जनता पक्षाचा पराभव करा, असा आदेश कार्यकारिणीने काँग्रेसजनांना दिला याचा प्रत्यक्षात अर्थ इंदिरा गांधींना निवडून आणा असाच होता. एकाधिकारशाहीचा विरोध कोठे गेला ?

इंदिरा गांधींचा चिकमगळूरमधील विजय कमी लेखणे योग्य नाही. तसेच त्याला वाजवीपेक्षा जादा महत्त्व देणेही योग्य नाही. लोकसभेत प्रवेश हे इंदिरा गांधींचे सत्तेच्या मार्गावरील महत्त्वाचे पाऊल आहे. काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांना मिळेना, तेव्हा आपल्या हाती सर्व सूत्रे असलेली वेगळी काँग्रेस काढून इंदिरा गांधींनी पहिले पाऊल टाकले. त्यानंतरचे हे दुसरे पाऊल. यानंतर दोन्ही काँग्रेसपक्षांचे ऐक्य घडवून आणणे हे तिसरे पाऊल. जनता पक्षात फूट पडेल आणि आणखी फाडाफोड करून सत्तेवर येण्याची संधी आपणास मिळेल, असा त्यांचा आडाखा आहे.

दक्षिण तर आपलीच आहे, आता समस्तीपूर आणि फत्तेपूर जिंकून उत्तर दिग्विजयाची सुरुवात करू अशी भाषा इंदिरा काँग्रेसवाले बोलत होते; पण दोन्ही ठिकाणच्या पराभवाने त्यांना चांगला शह बसलेला आहे. जनता पक्षाच्या मतांमध्ये घट झाली. आपण १९७७ पेक्षा आपली मतसंख्या वाढविली एवढ्यावरच त्यांना समाधान मानावे लागत आहे. जनता पक्षाने समस्तीपूरची जागा २७ हजार मतांच्या आघाडीने व फत्तेपूरची जागा ३० हजार मतांच्या आघाडीने जिंकली. दोन्ही निवडणुकांत १९७७ च्या मानाने जनता पक्षाच्या मतात खूपच घट झालेली आहे. समस्तीपूरची निवडणूक कर्पूरी ठाकूर यांनी ३ लाख २७ हजार मतांच्या आघाडीने जिंकली होती. जून १९७७ च्या विधानसभा निवडणुकातच ही आघाडी ६७ हजारपर्यंत खाली आली होती. ती आणखी ४० हजारानी घटून आता २७ हजारपर्यंत खाली आली. फत्तेपूरमध्येही जनता पक्षाच्या मतात अशीच घट झालेली आहे. १९७७ मध्ये ही जागा जनता पक्षाने १ लाख ७० हजार मतांच्या आघाडीने जिंकली होती. जून १९७७ च्या विधानसभा निवडणुकीत ही आघाडी ४३ हजार मतापर्यंत आणि आता ३० हजार मतापर्यंत खाली आली. दोन्ही निवडणुका जिंकल्या, यावर समाधान न मानता जनता पक्षाच्यानेत्यांनी मतातील या घटीचे आत्मपरीक्षण करून लोकांचा पाठिंबा वाढविण्यासाठी सरकार आणि पक्ष संघटना या दोन्ही पातळ्यांवर उपाय योजायला हवेत.

समस्तीपूरच्या निवडणुकीत मुख्य प्रश्न राखीव जागांचा होता. बर्गीकृत जाती आणि जमाती यांच्यासाठी असलेल्या २४ टक्के जागांशिवाय इतर मागासवर्गीयांसाठी आणखी २६ टक्के जागा राखीव जागा ठेवण्याचा निर्णय मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांनी गेल्या वर्षीच जाहीर केला होता. राखीव जागा विरोधकांनी त्याविरुद्ध आंदोलन केले. सरकारने निर्णयाचा फेरविचार करून २० टक्के जागा मागासवर्गीयांसाठी, ३ टक्के स्त्रियांसाठी, ३ टक्के अर्थिक दृष्टचा मागासलेल्यांसाठी, अशी विभागणी केली. जनता पक्षाला निवडून देऊन हे धोरण आपणास मान्य आहे, असा कौल मतदारांनी दिला. राखीव जागांच्या प्रश्नावर विध्वंसक निदर्शने बिहारमध्ये अजूनही चालू आहेत; पण या दहशतवादापुढे मान न झुकवता बिहार सरकारने खंबीरपणे पिछड्या जमातींच्या मागे उभे राहिले पाहिजे.

चिकमगळूरमध्ये पिछड्या जमातींचा पाठिंबा इंदिरा गांधींना मिळाला पण समस्तीपूर व फत्तेपूरमध्ये मिळाला नाही. तेथे पिछड्या जमातींचा जनता पक्षाला पाठिंबा, तर उच्च जमातींचा इंदिरा काँग्रेसला पाठिंबा, असे दृश्य दिसून आले. हरिजनांचा पाठिंबा याच तिन्ही निवडणुकांत इंदिरा काँग्रेसला मोठ्या प्रमाणावर असल्याचे आढळले. १९७७ मध्ये हरिजनांची मते जनता पक्षाला मिळाली होती. हरिजनांसाठी इंदिरा काँग्रेसने विशेष काही केलेले नाही, पण आपणच हरिजनांच्या कैवारी, अशी प्रतिमा निर्माण करण्यात मात्र इंदिरा गांधींनी यश मिळविले.

चिकमगळूर व समस्तीपूरमध्ये मुस्लीमांची मते इंदिरा काँग्रेसला मिळाली असली तरी फत्तेपूरमध्ये मुस्लिमांची एक गठ्ठा मते मिळविण्यात तिला यश आले नाही. तिन्ही निवडणुकांत अलीगड-दंगलीचा भरपूर उपयोग इंदिरा काँग्रेसने प्रचारासाठी केला, पण फत्तेपूरमध्ये त्याचा फारसा प्रभाव पडल्याचे दिसत नाही. १९७७ प्रमाणेच या वेळेही जनता पक्षाने मुस्लीम उमेदवार उभा केला होता. जनता पक्षावर जनसंघाचा आणि जनसंघावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रभाव आहे. हे मुस्लिम द्वेष्टे आहेत, हा इंदिरा काँग्रेसचा प्रचार मतदारांना पटला नाही. या तीन निवडणुकांनी राजकीय पक्षबळात फारसा फरक पडला नाही.

या तीन निवडणुकांबरोबरच मुंबई महापालिका निवडणुकांचा विचार करायला हवा. चिकमगळूरचा परिणाम या निवडणुकांवर होईल असे अंदाज इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी केले होते, पण तसे घडले नाही. मुंबई महापालिकेत १४० पैकी ८५ जागा जनता व मित्रपक्षांनी जिंकल्या. मुंबई महापालिकेत सत्तारूढ आघाडीस एवढे मोठे बहुमत अनेक वर्षांनंतर प्रथमच मिळाले आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकांत मुंबईच्या सर्व जागा जनता पक्षाने जिंकल्या होत्या हे लक्षात घेता महापालिकेच्या निवडणुका त्याने शरद पवार-गटाची मदत न घेता का लढविल्या नाहीत ? सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणुकांत मात्र पवारगटाने अनेक ठिकाणी वसंतदादांच्या काँग्रेसशीच सहकार्य केले. फक्त एक–दोन ठिकाणी जनता–पवारगट आघाडीला विजय मिळाला. पवारगटाच्या या धोरणाने जनता-कार्यकर्ते नाराज झालेले आहेत. असे असले तरी सत्तारूढ पुरोगामी लोकशाही आघाडी आता वरपासून खालपर्यंत म्हणजे जिल्हापरिषद निवडणुकांपर्यंत बांधली जाणार असे दिसते. मुंबईला एवढे भरीव बहुमत मिळाल्यानंतर आता एकजूट टिकवून महापालिका-कारभाराचे चित्र जनता व मित्रपक्षांनी बदलून टाकायला हवे.

चिकमगळूर-निवडणुकीनंतर काँग्रेस-एकीकरणाच्या हालचालींनी पुनः वेग घेतला. इंदिरा गांधींनी ऐक्याचे आवाहन केले. काँग्रेस-कार्यकारिणीने ११ विरुद्ध ६ मतांनी त्यास अनुकूल प्रतिसाद दिला. चव्हाणगटाने विरोध केला; पण कार्यकारिणीस आपल्या बाजूला वळविण्यात त्यांना यश आले नाही. अंतर्गत लढ्याची भाषा त्यांचे काही नेते बोलत आहेत; पण आतापर्यंतचा अनुभव पाहता या गटाला त्यात यश येईल असे वाटत नाही. इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीला विरोध करण्याची भाषा या गटाचे नेते बोलत राहिले तरी प्रत्यक्षात कसोटीच्या

प्रसंगी त्यांनी ठाम इंदिराविरोधी भूमिका घेतली नाही. मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसने इंदिरा-काँग्रेसशी आघाडी केली. त्यापूर्वी महाराष्ट्रात सरकार बनविण्यासाठी इंदिरा-काँग्रेसशी त्यांनी अशीच आघाडी केली. चिकमगळूरमध्ये त्यांनी आपला उमेदवार तर उभा केला नाहीच; पण इंदिराविरोधी प्रचारही केला नाही. समस्तीपूर व फत्तेपूर पोटनिवडणुकीत इंदिरा-काँग्रेसशी लढत देण्याचे धैर्य त्यांनी दाखविले नाही.

इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीला प्रभावी विरोध करावयाचा तर काँग्रेसबाहेर पडून जनता पक्षाशी सहकार्य करणे हाच या गटापुढे मार्ग आहे. महाराष्ट्रात शरद पवारगटाने ते धैर्य दाखविले; पण अखिल भारतीय पातळीवर चव्हाणगट ते कितपत दाखवील याची शंका वाटते. ठाम कृती करावयाची तर ती आताच करायला हवी. कार्यकारिणीत चव्हाणांनी ठाम भूमिका घेतली; पण ठाम भूमिकेमागोमाग ठाम कृती होणार असेल तरच त्याला अर्थ आहे. ऐक्य-वाटाघाटींना काय वळण मिळते पाहू या असे या गटाच्या एका नेत्याने म्हटले; पण ऐक्य तत्त्वतःच अमान्य असेल तर ही भाषा कशाला? तत्त्वाबाबतचा डळमळीतपणाच त्यातून सूचित होत नाही का? स्वर्णसिंग-काँग्रेसचा मोठा गट इंदिरा-काँग्रेसला मिळणार. चव्हाणगट त्यांना आपल्या बाजूला वळविण्यात यशस्वी होण्याची शक्यता कमी असे दृश्य आज तरी दिसत आहे शरद पवारांनी म्हटल्याप्रमाणे काँग्रेस-कार्यकारिणीचा निर्णय म्हणजे काँग्रेसच्या बरखास्तीचाच निर्णय आहे. चव्हाणगट वेगळा अखिल भारतीय पक्ष काढणार नसेल तर महाराष्ट्रापुरता प्रादेशिक पक्ष काढण्याशिवाय दुसरा मार्ग पवारांपुढे नाही; पण तूर्त तो निर्णय पुढे ढकलण्यात आला आहे.

दोन काँग्रेस पक्ष एक झाले तरी सत्ता हाती येण्याच्या दृष्टीने त्याचा फारसा उपयोग नाही. तेव्हा जनता पक्षात गेलेल्या काँग्रेसजनांनाही पुन: काँग्रेसमध्ये आणण्याचे प्रयत्न केले जातील. दोन काँग्रेस पक्षांच्या एकीकरणानंतर जनता पक्षात फाटाफूट घडवून आणणे हे इंदिरा गांधींचे पुढचे पाऊल राहील. तशी चाचपणी त्यांनी यापूर्वीही केलेली आहे. जुन्या–नव्या सर्व काँग्रेसवाल्यांनी एकत्र येऊन पूर्वीसारखा प्रबळ काँग्रेस पक्ष स्थापन करावा ही कल्पना मोरारजीभाईंपुढेही त्यांनी मांडली होती; पण त्यांनी ती फेटाळून लावली. जगजीवनरामही अशीच भूमिका घेतील; पण हे प्रमुख नेते जरी काँग्रेसमध्ये पुन: आले नाहीत तरी त्यांच्या अनुयायांना आपल्या बाजूला आणता येईल असे इंदिरावाद्यांना वाटते. जनता पक्षात फूट पडण्यावरच ही उद्दिष्टे साध्य होणे अवलंबून आहे. किंबहुना हा फुटीचा संभव दिसत असल्यानेच एकीकरणाची एवढी घाई इंदिरावाद्यांना झालेली आहे; पण जनता पक्षाची एकजूट टिकली तर हे उद्देश विफल होतील.

जनता पक्षाच्या उज्जयिनी येथील शिबिरास या दृष्टीनेच महत्त्व होते. हातची सत्ता जाण्याच्या भीतीने जनता पक्षातील घटक गट पक्षात फूट पडू न देता एकजूट टिकवितीलही; पण अशा एकजुटीला अर्थ नाही. पक्षाची उद्दिष्टे साधण्यासाठी अभिवचने पुरी करण्यासाठी एकजूट हवी, यावर शिबिराच्या उद्घाटनाच्या भाषणात अध्यक्ष चंद्रशेखर यांनी भर दिला; आपण संसदीय लोकशाही पुन्हा प्रस्थापित केली एवढे म्हणणे पुरेसे नाही. आपल्या मूलभूत गरजा भागल्या जाव्यात अशी लोकांची अपेक्षा आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. समाजातील दुर्बल गट, हरिजन, आदिवासी, भूमिहीन शेतमजूर यांचे जीवन सुधारण्याच्या कार्यक्रमावर, तसेच बेकारीनिवारण, आर्थिक विषमता कमी करणे, जमीनसुधारणा या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर भर द्यायला हवा असे आवाहन शिबिरात करण्यात आले. चंद्रशेखर यांनी सरकारच्या कामगिरीवर टीका केली होती. पंतप्रधान मोरारजीभाईंनी सरकारी धोरणाचे समर्थन केले. या दोन नेत्यांत मतभेद आहेत काय? असा ग्रह त्यामुळे निर्माण झाला. आमच्यात मतभेद नाहीत. कारभार सुधारावा या उद्देशानेच मी टीका केली हे चंद्रशेखर यांनी स्पष्ट केले. शिबिरात सरकारी कारभारावर व धोरणावर जेवढी मनमोकळी टीका झाली तेवढी पक्षसंघटनेच्या कार्यावर झाल्याचे दिसले नाही. काय करायला हवे याची नेत्यांना जाणीव आहे; पण वाण आहे ती प्रत्यक्ष कृतीची.

मोरारजीभाई-चरणसिंग बोलणी अयशस्वी झाली आणि मंत्रिमंडळात जाण्याचा प्रश्न आमच्या बाजूने आम्ही संपविला असल्याचे चरणसिंगांनी जाहीर केले. राजिनाम्यापूर्वीची जैसे थे परिस्थिती निर्माण करावी म्हणजेच आपणास गृहमंत्रिपद द्यावे अशी चरणसिंगांची मागणी होती. मोरारजीभाई त्यांना मंत्रिमंडळात घेण्यास तयार होते; पण त्यांच्याकडे गृहखाते देण्यास त्यांनी नकार दिला. मोरारजींवर दडपण आणण्यासाठी काही केंद्रीय मंत्र्यांनी राजिनाम्याचीही धमकी दिली; पण मोरारजीभाई आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. आपण पक्षातून बाहेर पडणार नाही असे चरणसिंगांनी जाहीर केले; पण पक्षांतर्गत संघर्ष संपले असा त्याचा अर्थ नाही. पक्षाच्या निवडणुकांनंतर पक्षाचे अध्यक्षपद मिळवून आणि ते प्रभावीपणे हाताळून मोरारजींना शह देण्याचा त्यांचा प्रयत्न राहील. किसानमेळावा २३ डिसेंबरला होणार आहे. त्यात भाग घेतल्याबद्दल चरणसिंग गटाविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे धैर्य पक्षनेतृत्व दाखवील काय? संघर्ष चालू राहिले तरी पक्षात फूट पडण्याइतके ते ताणले जातील असे वाटत नाही. कारण फूट पडली की सत्ता हातची जाईल याची सर्वच घटकांना जाणीव आहे. इंदिराकाँग्रेसला ते समाधान हे घटक पक्ष मिळू देणार नाहीत.

इंदिरा गांधींनी लोकसभेचा हक्कभंग केल्याबद्दल त्यांना काय शासन करावयाचे याचा निर्णय अजून लागलेला नाही. या प्रकरणातून उपस्थित झालेल्या प्रश्नांसंबंधी विवेचन म्हणूनच आता करता येत नाही.

पंतप्रधान मोरारजीभाईंच्या खुनाचा कट इंदिरावाद्यांनी केल्याची माहिती पोलिस कमिशनरांनी आपल्याला कळविल्याचे सभापती हेगडे यांनी लोकसभेत सांगितले तेव्हा एकच खळबळ उडाली. पंतप्रधान तसेच हक्कभंग समितीचे सर्व सभासद यांच्या निवासस्थानापुढे कडक पोलिसबंदोबस्त ठेवण्यात आला. श्रीमती इंदिरा गांधींच्या खुनाचा कट बिहारच्या एका जनता खासदाराने केल्याचा प्रत्यारोप इंदिराकाँग्रेस पक्षाचे नेते स्टीफन यांनी केला. सभापतींना कळविण्यात आलेली माहिती त्यांनी गुप्त ठेवायला हवी होती असे त्यांचे म्हणणे. खूनकटाच्या या दोन बातम्या केवळ अफवा होत्या की त्यांना काही भरीव आधार होता? शांततापूर्ण मार्गाने प्रश्न सोडविण्यावर आमचा विश्वास आहे. राजकीय खुनांचे तंत्र आम्ही भारतीय राजकारणात येऊ देणार नाही असे सर्व प्रमुख पक्षांच्या नेत्यांनी जाहीर करायला हवे. □